www.lokrakshanay.com

लोकशाहीच्या संरक्षणार्थ

लोकरक्षणाय

• LOKRAKSHANAY • RNI TC NO. MAHBIL10469

•Editor- Rakesh Shankar Gore •Daily •Thane •Volume-01, Issue-213 • Sunday, 07 January 2024 •Pages-04 •Rs.2/-

अनमोल विचार

"भूतकाळ बदलला जाऊ शकत नाही, परंतु भविष्य आपल्या हातात आहे."

लक्षवेधी

ज्या मद्य घोटाळ्याचे अरविंद केजरीवालांवर आरोप, त्याच्या विक्रीतून दिल्ली सरकारला बंपर कमाई

नवी दिल्ली : आम आदमी पक्षाचे प्रमुख आणि दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल हे मद्य घोटाळ्याच्या आरोपांमुळे पुन्हा एकदा चर्चेत आहेत. आपच्या काही नेत्यांकडून केजरीवाल यांना ईडी अटक करेल, असा दावा करण्यात येत आहे. या प्रकरणात याआधी ईडीने मनीष सिसोदिया आणि संजय सिंह यांना अटक केली आहे. मात्र ज्या मद्य घोटाळ्यावरून आम आदमी पक्ष आणि अरविंद केजरीवाल यांना लक्ष्य करण्यात येत आहे, त्याच्या माध्यमातूनच दिल्ली सरकार मालामाल होत असल्याची माहिती समोर येत आहे. दिल्लीमध्ये मद्याची अधिक दुकाने असल्याने आणि वेगवेगळ्या ब्रँड्सची उपलब्धता असल्याने मद्याच्या विक्रीमध्ये वाढ होत आहे.

द्वारकाधीशांच्या दर्शनाला आले सरन्यायाधीश; पोलिसांची लगबग

नवी दिल्ली : देशाच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश डी.वाय. चंद्रचूड यांनी शनिवारी गुजरातमधील द्वारकाधीश मंदिरात ते पिवळ्या रंगाचा कुर्ता आणि पायजमा परिधान करुन सपत्नीक द्वारकाधीश श्रीकृष्ण यांच्या दर्शनासाठी जात असल्याचं दिसून आल. सरन्यायाधीश चंद्रचूड यांच्यापुढे मंदिरातून बाहेर आलेले पोलीस पायात बुट घालण्यासाठी चांगलीच धावपळ करताना व्हिडिओत दिसून येतात. सरन्यायाधीशांसमोर पुजारीही धावताना दिसून येतात, तर सुरक्षेसाठी मोठा पोलीस बंदोबस्तही दिसून येतो. जामनगर आणि द्वारका या दोन्ही जिल्ह्यातील अधिकारी व सुरक्षा अधिकारी त्यांच्या सेवेत व सुरक्षेत तैनात होते.

इस्रोच्या सूर्य मोहिमेने रचला विक्रम; PM मोदींनी शास्त्रज्ञांचे केले कौतुक

नवी दिल्ली : इस्रोने नवीन वर्षाच्या सुरुवातीलाच मोठा इतिहास रचला आहे. इस्रोने सुर्याच्या अभ्यासासाठी पाठविलेले आदित्य एल१ उपग्रह निश्चितस्थळी पोहोचले आहे. एल१ म्हणजेच लैग्रेंज पॉईंट१ (एल१) जवळहॅलो कक्षेमध्ये आदित्य एल १ आज पोहचलं आहे. यामुळे इस्रोला मोठं यश मिळालं आहे. इस्रोच्या या कामगिरीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ट्विट करत आनंद व्यक्त केला आहे. भारताने आणखी एक टप्पा पूर्ण केला. भारताची पहिली सौर वेधशाळा आदित्य एल१ हे उपग्रह निश्चितस्थळी पोहोचले आहे. आमच्या शास्त्रज्ञांनी अत्यंत क्लिष्ट आणि गुंतागुंतीच्या अंतराळ मोहिमा यशस्वी करण्यासाठी अथक परिश्रम केले.

लोकसभा निवडणुकांची मार्चमध्ये घोषणा ! निवडणूक आयोग करणार राज्यांचा दौरा

नवी दिल्ली : लोकसभा निवडणुका वेळेवरच होणार असून मार्च महिन्यातील पहिल्या आठवड्यात घोषणा होणार असल्याचे बोलले जात आहे. लोकसभा निवडणूकांच्या पूर्व तयारीची पाहणी करण्यासाठी निवडणूक आयोग सात जानेवारीपासून राज्यांच्या दौऱ्यांना प्रारंभ करणार आहे. आयोग सर्व प्रथम आंध्र प्रदेश व तामिळनाडूच्या दौऱ्यावर जाणार आहे. देशातील आगामी लोकसभा निवडणुकीच्या तयारीसाठी निवडणूक आयोग ॲक्शन मोडमध्ये आला आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या वेळी फेब्रुवारीच्या अखेरीस किंवा मार्चच्या पहिल्या आठवड्यात निवडणुका जाहीर होऊन एप्रिलमध्ये निवडणुका घेतल्या जाऊ शकतात. २०१९ च्या निवडणुकीची घोषणा १० मार्च रोजी झाली होती. त्यानंतर ११ एप्रिल ते १९ मेदरम्यान देशभरात सात टप्प्यांत मतदान झाले.

बिलकिस बानो प्रकरणावर सोमवारी सुनावणी, ११ दोषींसंदर्भात सर्वोच्च न्यायालय देणार निर्णय

नवी दिल्ली : बिलकिस बानो प्रकरणात ११ दोषींच्या सुटकेच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकेवर सोमवारी सर्वोच्च न्यायालय निर्णय देणार आहे. बिलकिस बानोच्या वकिलांनी ही याचिका दाखल करताना म्हटले होते की अजूनही बिलकिस बानो त्या प्रसंगाच्या धक्क्यातून सावरलेली नाही. अशात दोषी आरोपींची सुटका करण्यात आली. दुसरीकडे सर्वोच्च न्यायालयानेही या प्रकरणात प्रश्न उपस्थित केले होते. सर्वोच्च न्यायालयाने नेमक्या कुठल्या निकषांवर ही सुटका केली ते विचारले होते. या प्रकरणात मे २०२२ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने गुजरात सरकारला निर्णय घेण्यास सांगितले होते.

सोनिया गांधी गोव्याच्या खासगी भेटीवर

नवी दिल्ली : काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी वैयक्तिक भेटीवर गोव्यात आल्या आहेत, अशी माहिती पक्षाच्या स्थानिक पदाधिकाऱ्याने दिली. त्या शुक्रवारी गोव्यात दाखल झाल्या आहेत. पीटीआयशी बोलताना पोलीस उपअधीक्षक सलीम शेख म्हणाले, सोनिया गांधी यांचे काल दुपारी २.४० वाजता दाबोलीम आंतरराष्ट्रीय विमानतळावर नियमित विमानाने आगमन झाले. त्यानंतर त्या दक्षिण गोव्यातील एका रिसॉर्टमध्ये गेल्या. त्यांचा हा दौरा पुर्ण खासगी आहे, कारण आत्तापर्यंत कोणत्याही अधिकृत कार्यक्रमाची माहिती त्यांच्याकडून आलेली नाही असे ते म्हणाले. स्थानिक काँग्रेस कार्यकर्त्यांनी सांगितले की गोव्यातील त्यांच्या मुक्कामादरम्यान सोनिया गांधी कोणत्याही पक्षाच्या बैठका घेणार नाहीत किंवा नेत्यांशी संवाद साधणार नाहीत.

ज्ञानव्यापी संकुलाच्या पुरातत्व सर्वेक्षणाचा २४ जानेवारीला होणार निर्णय

नवी दिल्ली : वाराणसी येथील ज्ञानव्यापी मशिद संकुलावरील भारतीय पुरातत्व खात्याचा सीलबंद अहवाल लोकांसाठी खुला करायचा की नाही याचा निर्णय २४ जानेवारी रोजी घेतला जाईल असे येथील न्यायालयाने म्हटले आहे. हा निर्णय जिल्हा न्यायाधीश ए के विश्वेश यांनी दिला आहे, असे हिंदू पक्षाचे वकील मदन मोहन यादव यांनी सांगितले. या संबंधात झालेल्या सुनावणीच्या वेळी हिंदू आणि मुस्लिम बाजूचे वकील तसेच भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाचे वकिल न्यायालयात उपस्थित होते. पुरातत्व खात्याने मशिद संकुलात जाऊन वैज्ञानिक स्वरूपाचे सर्वेक्षण केले आहे. या जागी पुर्वीच्या काळी मंदिर अस्त्वात होते आणि ते पाडून तेथे आक्रमकांनी मशिद बांधली असा आक्षेप आहे.

बीएमसी ॲक्शन मोडवर! 'या' गोष्टीवर होणार कारवाई, आयुक्तांचे कठोर आदेश

■मुंबई। यश सावंत,

बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीतील अनधिकृत फलक, बॅनर्स, बेवारस वाहने, पदपथावरील अतिक्रमण आदींबाबत कठोर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त डॉ. अश्विनी जोशी यांच्या उपस्थितीत बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालयात आढावा बैठक घेण्यात आली आहे. अनधिकृत फलक छपाई करून देणाऱ्या प्रिंटिंग व्यावसायिकांनाही नोटिसा बजावणार असल्याचं बीएससीकडून सांगण्यात आलंय. बृहन्मुंबई महानगरपालिका (BMC) हद्दीतील अनधिकृत फलक, बॅनर्स, बेवारस वाहने, पदपथावरील अतिक्रमण आदींबाबत कठोर कारवाई करण्याचे निर्देश अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी यांनी दिले आहेत.

मुंबई महानगरातील अतिक्रमण निर्मूलन विषयक कार्यवाहीचा, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) श्रीमती डॉ. अश्विनी जोशी यांनी बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालयातील सभागृहात काल आढावा घेतला. त्यावेळी त्यांनी हे निर्देश दिले. उप आयुक्त (विशेष) संजोग कबरे, सहायक आयुक्त (अतिक्रमण निर्मूलन) मृदुला अंडे यांच्यासह अनुज्ञापन विभागाचे आणि इतर सर्व संबंधित विभागांतील अधिकारी उपस्थित होते.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने मुंबई सुशोभीकरणाची मोहीम हाती घेतली आहे. मुंबई महानगर अधिकाधिक सुंदर, स्वच्छ ठेवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरू आहेत. असं असताना, बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीतील रस्ते दुभाजकांमध्ये लावलेल्या अनधिकृत फलकांमुळे सुशोभीकरणात बाधा येत आहे. कोणतीही परवानगी न घेता फलक लावले जात असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे यापुढे असे अनधिकृत फलक लावणाऱ्यांसह ते छपाई करून देणाऱ्या प्रिंटर्स व्यावसायिकांनाही नोटीस बजावण्याचे निर्देश डॉ. जोशी यांनी बैठकीत दिले.

तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीत आढळून येणारी बेवारस व भंगार वाहने हटविण्याची कारवाई करावी. पदपथांवरील अतिक्रमण हटविण्याची मोहीम सतत सुरू असते. मात्र यापुढे या कारवाईला वेग देण्यात यावा, त्यासाठी प्रसंगी पोलिसांची मदत लागली तरी घ्या. सर्व कारवाई करताना महानगरपालिकेच्या सर्व प्रभाग कार्यालयांतील तसेच विविध खात्यांनी एकत्रितपणे व समन्वयाने मोहीम राबवावी. सहभागी सर्व संबंधित विभागांनी दररोज जी कारवाई केली, त्याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांना अहवाल सादर करावा, असेही अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त जोशी यांनी बैठकीत सर्व संबंधित अधिकाऱ्यांना सांगितले.

नागपुरातील आईस फॅक्टरीत स्फोट; अमोनिया वायूच्या गळतीमुळे टाकी फुटली

■नागपूर। सचिन कदम,

कपिलनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील उप्पलवाडी येथील बालाजी आइस फॅक्टरीत स्फोट झाल्याने एका श्रमिकाचा मृत्यू झाला असून तीन श्रमिक जखमी झाले आहेत. ही घटना शनिवारी सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास घडली.

दोन श्रमिकांना मेयोत दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती कपिलनगर पोलिसांनी दिली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही फॅक्टरी विजय जुगलकिशोर शाहू यांच्या मालकीची असून, गेल्या जूनपासून उत्पादन बंद आहे. सुमारे पाच हजार चौरस फुटात असलेल्या फॅक्टरीच्या पहिल्या माळ्यावर श्रमिक राहतात. तर तळ मजल्यावर उत्पादन घेण्यासाठी मशिन्स लावण्यात आल्या आहेत. आठवड्यातून दोन दिवस ही फॅक्टरी काही तास सुरू करण्यात येते.

विजय हे कुटुंबासह बाहेरगावी गेले असून त्यांचा पुतण्या अजय शाहू हे फॅक्टरीचे काम बघत आहेत. शनिवारी सायंकाळी तीन श्रमिक फॅक्टरीत सफाई करत होते. अमोनिया वायूची गळती झाली. त्यामुळे अमोनिया जमा होणाऱ्या टाकीत स्फोट झाला. यात एका कामगाराचा मृत्यू झाला तर तीन कामगार जखमी झाले. त्यापैकी एकाच्या मनगटाला दुखापत झाली. दुसरा अमोनिया वायुमुळे बेशुद्ध झाला.

माहिती मिळताच कपिलनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक कोळी यांच्यासह पोलिस व अग्निशमन विभागाचा ताफा तेथे पोहोचला. पोलिसांनी दोन जखमींना लगेचच मेयो हॉस्पिटलमध्ये दाखल केले. जखमींची प्रकृती स्थिर असल्याची माहिती असून, वृत्त लिहिपर्यंत जखमींची नावे कळू शकलेली नाहीत. टाकीत सुमारे एक हजार किलो अमोनिया असून तो परिसरात पसरला आहे.

जीएसटी अधिकाऱ्याकडे सापडली ६५ लाखांची बेनामी मालमत्ता; सीबीआयने केली अटक

■मुंबई। दिगंबर जाधव,

केंद्रीय वस्तू व सेवा कर विभागाच्या कर चुकवेगिरी पथकात उपाधीक्षक पदावर काम करणाऱ्या एका अधिकाऱ्याकडे ६५ लाखांची बेनामी संपत्ती सापडली असून सीबीआयने छापेमारी करत त्याला अटक केली आहे.

सोमेश्वर राव असे या अधिकाऱ्याचे नाव असून २०१३ ते २०२२ या कालावधीमध्ये तो नवी मुंबईत कार्यरत होता. या सेवा काळात त्याने गैर प्रकारे ही माया गोळा केल्याचे प्राथमिक तपासात आढळून आले आहे.

करचुकवेगिरी करणाऱ्या लोकांविरोधात काम करणाऱ्या जीएसटीच्या महत्वपूर्ण विभागात सोमेश्वर राव उप-अधिक्षक म्हणून कार्यरत होता. आपल्या पदाचा गैरवापर करत त्याने ही लाखोंची माया गोळा केली आहे. यातील काही मालमत्ता त्याच्या स्वतःच्या नावावर आहेत. तर अनेक मालमत्तांची खरेदी त्याने कुटुंबीयांच्या नावे केल्याचे सीबीआयच्या तपासात आढळून आले आहे.

'विरोधकांचा आवाज दाबण्याचा सरकारचा प्रयत्न' - मल्लिकार्जुन खर्गे

■नवी दिल्ली। प्रगती शर्मा,

केंद्र सरकार सातत्याने विरोधकांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करीत असल्याचा आरोप आज काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी केला. मणिपूरमध्ये एक दुर्दैवी घटना घडली, पण पंतप्रधान मोदी समुद्रकिनाऱ्यावर जाऊन फोटो सेशन करून घेतात.

ते मुंबई असो वा केरळ, सगळीकडे जातात, त्यांचे फोटो सगळीकडे दिसतात. देव दर्शन देत असल्यासारखे त्यांचे फोटो काढले जातात. पण हे महापुरुष मणिपूरला का जात नाही?, असा प्रश्न देखील त्यांनी केला. भारत जोडो न्याय यात्रेच्या लोगोच्या प्रकाशन प्रसंगी ते बोलत होते. 14 जानेवारीपासून सुरू होणाऱ्या भारत जोडो न्याय यात्रेबाबत पक्ष कार्यालयात त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. ते म्हणाले, राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली मणिपूरपासून सुरू होणारी ही यात्रा देशाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि मूलभूत मुद्द्यांवर काढली जात आहे. सर्वांच्या पाठिंब्याची गरज आहे. हा प्रवास जनजागृतीसाठी आहे. या प्रवासातून आम्ही समाजातील गरीब आणि विविध लोकांशी जोडण्याचा प्रयत्न करणार आहोत. ती यशस्वी करण्यासाठी काँग्रेसचे सर्व नेते पूर्ण प्रयत्न करतील. भारतातील नेत्यांनीही या प्रवासात सहभागी होऊन ती यशस्वी करावी अशी माझी इच्छा आहे.

'राज ठाकरेंनी किती सहकारी संस्था उभ्या केल्या? उपमुख्यमंत्री अजित पवारांचा मनसे अध्यक्षांना सवाल

■पुणे। नितीन देवळेकर,

महाराष्ट्र नवनिर्माण सहकार सेना आयोजित तिसरी वार्षिक सहकार परिषदेत बोलताना राज ठाकरे यांनी राज्यकर्त्यांवर निशाणा साधला होता. राज्यातील आत्ताची चळवळ ही सहारा चळवळ आहे. एकमेकांना सहारा देऊन सरकार चळवळ सुरू आहे, अशी टीका राज ठाकरेंनी केली होती. मनसे अध्यक्ष राज ठाकरेंच्या टीकेला उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्रत्यूत्तर दिले आहे.

काय म्हणालेत अजित पवार?

पुणे शहरात मेट्रोचे काम जोरात सुरू आहे. निगडीपर्यंत मेट्रो गेली आहे. आम्ही चांदणी चौकापर्यंत मेट्रो नेत आहोत. त्यामुळे पुण्याला मेट्रो निधी नाही मिळाला आणि नागपूरला मिळाला हे धाधांत खोटं आहे.. असे राज ठाकरे यावेळी म्हणाले. तसेच १२ तारखेला पंतप्रधान नरेंद्र मोदी महाराष्ट्र दौऱ्यावर येत आहेत. यावेळी जवळपास ४६ हजार कोटी रुपयांचे विकास कामाचे उद्घाटने होणार आहेत.. अशी माहितीही त्यांनी दिली. राज ठाकरेंनी सहकारावर केलेली टीका हे त्यांचे वैयक्तिक मत आहे. आजपर्यंत त्यांनी किती सहकारी संस्था उभ्या केल्या? असा सवाल अजित पवार यांनी विचारला. तसेच मी सुद्धा सहकारी चळवळीतून पुढे आलेला कार्यकर्ता आहे. मी पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे ३५ वर्ष प्रतिनिधीत्व केले.

१० वर्षापूर्वीच्या जमिनीच्या वादातून मोहोळचा गेम, २ वकिलांच्या सल्ल्याने रचला कट

■पुणे। अभिजित येरल्लू,

गँगस्टर शरद मोहोळ याचा भर रस्त्यात गोळ्या झाडून खून करणाया साहिल पोळेकर याच्यासह त्याला मदत करणाया ८ जणांना ८ तासात अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे. दोन वकिलांच्या सल्ल्याने नामदेव कानगुडे याने मोहोळचा गेम करण्याचा कट रचला. त्यासाठी मोहोळच्या टोळीत मुन्ना पोळेकर याला घुसवले होते. त्यातूनच त्याची सर्व माहिती कानगुडे याला मिळत होती. १० वर्षापूर्वी झालेल्या जमिनीच्या वादातून हा प्रकार घडल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

साहिल ऊर्फ मुन्ना पोळेकर(वय २०, रा. सुतारदरा, कोथरुड), विठ्ठल किसन गांदले (वय ३४, रा. सुतारदरा, कोथरुड), अमित मारुती कानगुडे (वय २४, रा. धायरी), नामदेव महिपत कानगुडे (३५, रा. भूगाव), चंद्रकांत शाहु शेळके (वय २२, रा. जनता वसाहत, पर्वती), विनायक संतोष गाव्हणकर (वय २०, रा. जनता वसाहत, पर्वती), ॲड. रवींद्र वसंतराव पवार (वय ४०, रा. नांदे आणि ॲड. संजय रामभाऊ उडान (वय ४५, रा. उजवी भुसारी कॉलनी, कोथरुड) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. नामदेव कानगुडे हा पूर्वी सुतारदरा येथे शरद मोहोळ याच्या घराजवळ रहात असे. त्यांच्यात वाद झाल्यानंतर तो भूगावला राहण्यास गेला होता. त्यावेळी झालेल्या वादाच्या रागातून तो मोहोळ याचा काटा काढण्याची संधी शोधत होता. याबाबत अरुण धुप्रद धुमाळ (वय ३२, रा. जयभवानीनगर, कोथरुड) यांनी कोथरुड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

बालगंधर्वची जुनी इमारत पाडणार; राज्याचे मुख्य सचिव नितीन करीर यांची घोषणा

■पुणे। प्रतिनिधी,

बालगंधर्व रंगमंदिराची जुनी झालेली इमारत पाडून तेथे नव्याने नाट्यगृह बांधण्याचा प्रस्ताव गेल्या दीड वर्षापासून अडगळीत पडलेला असताना आता मात्र, ही इमारत पाडण्यावर शिक्कमोर्तब झाले आहे. राज्याने नवे मुख्य सचिव नितीन करीर यांनीच याबद्दल शनिवारी एका कार्यक्रमात बालगंधर्व रंगमंदिराचा नवा आराखडा ठरला असून, पुढील काही दिवसात ही वास्तू पाडली जाईल असे जाहीर केले आहे. त्यामुळे पुण्याच्या सांस्कृतिक आणि राजकीय क्षेत्रीय बालगंधर्व रंगमंदिराच्या पुनर्विकासाचा मुद्दा चर्चेत आला आहे. पुण्याच्या सांस्कृतिक क्षेत्रातील मानबिंदू म्हणून बालगंधर्व रंगमंदिराची ओळख आहे. राज्यभरातील कलाकारांनाही बालगंधर्वमध्ये त्यांची कला सादर करायला मिळावी अशी तीव्र इच्छा असते. गेल्या ५५ वर्षापासून बालगंधर्व हे पुण्याच्या सांस्कृतिक, राजकीय, सामाजिक जडणघडणीचे साक्षीदार आहे.

एमएमआरडीएने विकास कामे पूर्ण न केल्याने चिर्ले ग्रामस्थांचा अटलसेतुच्या उदघाटनाच्या दिवशी आंदोलनाचा इशारा

■उरण। विशाल पाटील,

न्हावा शेवा सागरी (अटलसेतु)मुळे उरणच्या चिर्ले गाव बाधित आहे. या ग्रामपंचायतींच्या हद्दीत २० कोटी खर्चाची नागरी विकास कामे करण्याचे आश्वासन एमएमआरडीएने दिले आहे. मात्र ते पूर्ण न झाल्याने उदघाटनाच्या वेळी आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. यामध्ये चिर्लेमधील प्रकल्पबाधीत शेतकऱ्यांना जमीनीचा मोबदलाही अद्याप अदा करण्यात आलेला नाही. मोबादला आणि विकासकामे करण्याची आश्वासने तोंडी नकोत तर लेखी स्वरूपात हमी देण्यात टाळाटाळ केली जात असल्याच्या निषेधार्थ हा इशारा देण्यात आला आहे.

या पुलामुळे मुंबईहून २० मिनिटांत नवी मुंबईला पोहता येणार आहे. शिवडी-न्हावा शेवा लिंक रोड उभारण्यासाठी शेकडो शेतकरी, मच्छीमार बाधीत झाले आहेत. सागरी सेतूचे काम पूर्ण झाल्यानंतरही अनेक मच्छी न्हावा, न्हावाखाडी, गव्हाण, जासई, घारापुरी आदी गावातील शेतकऱ्यांना जमीनीचा मोबदला तर मच्छीमारांना आर्थिक नुकसान भरपाई मिळाली नसल्याने सर्वच संघर्षाच्या पवित्र्यात आहेत.

तृतीयपंथी, वारांगनांना मिळणार मतदानाचा अधिकार

■पनवेल। भावना जैन,

घटनेने १८ वर्षे पूर्ण झालेल्या प्रत्येक व्यक्तीला मतदानाचा अधिकार दिला आहे. सार्वत्रिक निवडणुकीमध्ये मतदानाचा हक्क नागरिक बजावतात. तो अधिकार वारांगना आणि तृतीयपंथींना मिळावा, यासाठी पनवेल विधानसभा मतदारसंघ उपजिल्हा निवडणूक अधिकारी राहुल मुडके, पनवेलचे तहसीलदार विजय पाटील यांच्यासह निवडणूक विभागाने विशेष प्रयत्न केले आहेत. पनवेलमध्ये आतापर्यंत ८५ तृतीयपंथी व वारांगनांना मुख्य प्रवाहात आणण्यात आले आहे.

तृतीयपंथी हे आपल्या समाजातील घटक असले, तरी अद्यापही त्यांना पूर्णपणे स्वीकारण्यात आलेले नाही. त्यांच्याशी माणसांसारखा व्यवहार करण्यात येत नाही. त्यामुळे तृतीयपंथी हे सर्वाधिक उपेक्षितांमध्ये मोडतात. त्यांच्याएवढी हेटाळणी आणि कुचेष्टा कोणत्याही घटकाची होत नाही. त्यांना जगण्याची प्राथमिक संधीही नाकारल्या जातात. कुटुंबातही त्यांना प्रतिष्ठा नसते आणि आपुलकीची ऊबही मिळत नसते. असा चहुबाजूंनी उपेक्षा होणाऱ्या या घटकाला प्रतिष्ठा मिळावी, त्यांना सन्मान मिळावा, त्यांना अपमानास्पद वागणूक मिळू नये, यासाठी काही सामाजिक चळवळी कार्यरत आहेत. त्या चळवळीला काही अंशी यश आले आहे.

पत्नी, मुलांची हत्या...जादा मोबदल्याचं आमिष, हजारो नागरिकांची 400 कोटींची फसवणूक

■मुंबई । विशाल कारंडे,

पत्नी आणि मुलांची हत्या करणाऱ्या कल्याणमधील एका व्यावसायिकाने हजारो लोकांची फसवणूक केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. तब्बल ३५०० जणांना ४०० कोटींचा गंडा घातला आहे. फसवणूक झालेल्या नागरिकांनी शिवसेनेचे जिल्हा प्रमुख अरविंद मोरे यांच्या नेतृत्वात कल्याणचे सहाय्यक पोलीस आयुक्त कल्याणजी घेटे यांची भेट घेतली . या प्रकरणात गुन्हा दाखल झाल्यानंतर पुढील कारवाई होणार असल्याची माहिती घेटे यांनी दिली आहे.

पत्नी आणि मुलांची हत्या करणाऱ्या कल्याणमधील एका व्यावसायिकाने हजारो लोकांची फसवणूक केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. तब्बल ३५०० जणांना ४०० कोटींचा गंडा घातला आहे. फसवणूक झालेल्या नागरिकांनी शिवसेनेचे जिल्हा प्रमुख अरविंद मोरे यांच्या नेतृत्वात कल्याणचे सहाय्यक पोलीस आयुक्त कल्याणजी घेटे यांची भेट घेतली . या प्रकरणात गुन्हा दाखल झाल्यानंतर पुढील कारवाई होणार असल्याची माहिती घेटे यांनी दिली आहे.

दरम्यान शनिवारी सकाळी नागरिकांनी मोठ्या प्रमाणात शिवसेना जिल्हा प्रमुख अरविंद मोरे यांच्या नेतृत्वात कल्याणचे सहाय्यक पोलीस आयुक्त कल्याणजी घेटे यांची भेट घेतली. यावेळी प्रत्येक नागरिकांनी त्यांची व्यथा घेटे यांच्याकडे मांडली. अरविंद मोरे यांनी सांगितलं की, दीपक गायकवाड याने विविध कंपन्यांच्या माध्यमातून जवळपास ४०० कोटी रुपयांची फसवणूक केली आहे. जवळपास ३ हजार ५०० लोकांनी गायकवाड यांच्याकडे पैसे गुंतविले होते.

संपादकीय
राकेश शंकर गोरे

संशोधनक्षेत्रालाही लबाडीची वाळवी

विज्ञान-संशोधन क्षेत्रातील लबाडी, खोटेपणा, भ्रष्टाचार उघडकीस येण्याचा आजवरचा उच्चांक २०२३ मध्ये गाठला गेला. अशी तब्बल दहा हजारांवर प्रकरणे या एका वर्षात घडली. त्यामुळे या क्षेत्रातील विश्वासार्हतेचा प्रश्न उपस्थित झाला आहे. एखादा प्रसिद्ध झालेला शोधनिबंध परत घेण्याची वेळ येणे ही मोठी नामुष्की असते. तथापि, असे प्रकार अमेरिकेतील नामांकित विद्यापीठांतही घडले आहेत.

एका राज्यात एकदा उंदीर फार झाले. भलेमोठे उंदीर रात्री बाहेर पडून नासधूस करू लागले. राजाने दवंडी पिटवली की, उंदीर मारून त्याची शेपटी आणून देणाऱ्यास प्रत्येक शेपटीमागे बक्षीस दिलं जाईल. झालं! बक्षिसासाठी लोक उंदीर मारू लागले.

त्यासाठी रात्री जागू लागले, बिळं उकरू लागले. पण राज्यातील काही लोक अधिक हुशार होते. त्यांनी उंदीर पाळून त्याची पैदास करायला सुरुवात केली. आता हव्या तितक्या शेपट्या कमी कष्टात मिळू लागल्या. हा मोठ्या कमाईचा धंदा झाला. हे समजल्यावर राजाने शेपट्यामागे बक्षीस देण्याची योजना बंद केली. त्यावर आता यांचा काही उपयोग नाही म्हणून उंदीर पाळणाऱ्या लोकांनी सगळ्या उंदरांना सोडून दिलं. परिणामतः उंदीर मारा योजना सुरू करण्यापूर्वी जेवढे उंदीर होते त्यापेक्षा योजनेच्या शेवटी जास्तीच झाले.

एखादी योजना ज्या हेतूने सुरू केली जाते त्याच्या विरुद्ध परिणाम प्रत्यक्षात दिसतो. योजना आखताना सगळ्या बाजूंचा नीट विचार न केल्यास असं होऊ शकतं. संशोधनाच्या क्षेत्रात असं होत असल्याचा महाशोध आता संशोधकांना लागतो आहे. मूलभूत असो वा उपयोजित; संशोधनातून समाजाच्या भल्याच्या अनेक गोष्टी बाहेर पडत असतात, याविषयी दुमत असण्याचं कारण नाही. आता संशोधनाचं महत्त्व जगातल्या सगळ्याच देशांना पटलं आहे. आपल्या देशात चांगलं संशोधन व्हावं म्हणून जवळजवळ सर्व देशातील सरकारे कमी अधिक जोमाने प्रयत्न करीत आहेत. पण हे प्रयत्न योग्य दिशेने आहेत की कसं? त्यांचा परिणाम योग्य तऱ्हेने होतोय की नाही?

सरलेल्या २०२३ वर्षाला याविषयी काही महत्त्वाचं सांगायचंय. या वर्षात विज्ञान-संशोधन क्षेत्रातील लबाडी, खोटेपणा, भ्रष्टाचार उघडकीस येण्याचा आजवरचा उच्चांक गाठला गेला. एखादा प्रसिद्ध झालेला शोधनिबंध परत घेण्याची वेळ येणे ही मोठी नामुष्की असते. अशी तब्बल दहा हजारांवर प्रकरणे या एका वर्षात घडली. ही २०२२च्या तुलनेत एकदम दुपटीने वाढ आहे. आपली चूक लक्षात येऊन एखाद्या संशोधकाने खिलाडू वृत्तीने आपले म्हणणे मागे घेणे हे विज्ञानाच्या तत्त्वाला धरून आहे.

पण केवळ चूक नाही तर पद्धतशीरपणे केलेली लबाडी दुसऱ्याने दाखवून दिल्यावर संपादकांनी मागे घ्यायला लावणे किंवा तो लेखच काढून टाकणे, यासारखी लाजिरवाणी गोष्ट नाही. ही दहा हजार प्रकरणं मोजके अपवाद वगळता दुसऱ्या प्रकारातली आहेत. या भ्रष्टाचारात हार्वर्ड, स्टॅनफर्ड यासारखी विद्यापीठे, नेचर सारखी प्रतिष्ठित नियतकालिके गोवली गेली आहेत. यावर अनेक शास्त्रज्ञांनी हे केवळ हिमनगाचं टोक आहे; उघडकीस न आलेला भ्रष्टाचार यापेक्षा कैकपटींनी मोठा आहे॥, अशी प्रतिक्रिया दिली आहे. मला स्वतःला ह्यनरो वा कुंजरो वाह्ल प्रकारचे अनेक गैरव्यवहार माहिती आहेत जिथे सगळ्यांना खरी गडबड माहिती असली तरी ती सिद्ध करणं अवघड असतं. जे लोक ती सिद्ध करण्यासाठी धडपड करतात त्याचं काय होतं?

पीअररिव्ह्यू पद्धत सदोष

अमेरिकेतील एका विद्यापीठात पीएच.डी. करत असलेली एक विद्यार्थिनी आपल्या क्षेत्रात आधी झालेल्या कामाचा आढावा घेत होती. त्यात हार्वर्ड विद्यापीठातील एका प्रसिद्ध संशोधिकेच्या संशोधनात काहीतरी गडबड आहे, असं तिला वाटलं. खोलवर पाहिल्यावर हा डेटा खोटा आहे हे सिद्ध करण्याइतका पुरावा आहे, असं तिच्या लक्षात आलं. पण आपल्या मार्गदर्शिकेला हे सांगितल्यावर तिलाच उलट दटावून गप्प राहण्याचा सल्ला दिला गेला. पण या तरुण विद्यार्थिनीला गप्प बसवेना. तिने हे प्रकरण चव्हाट्यावर आणलंच. यावर चौकशी होऊन लबाडीने खोटा डेटा देणाऱ्या हार्वर्डमधील प्राध्यापिकेवर कारवाई झाली. पण या दरम्यान या विद्यार्थिनीला असंख्य अडथळ्यांना तोंड द्यावं लागलं. अलीकडेच या मुलीशी संपर्क करून मी विचारलं की, तू मानसशास्त्र विषयाची आहेस.

विज्ञान भ्रष्टाचारामागील मानसशास्त्र या विषयावर आपण बरोबरीनी काही लिहूयात का? यावर ती म्हणाली की, आता या क्षेत्राला मी इतकी उबगले आहे की, मी त्यातून पूर्णपणे बाहेर पडले आहे. संशोधनक्षेत्राच्या बाहेर राहूनच अधिक प्रामाणिकपणे काम करता येईल, असं मला वाटतं.

खरी परिस्थिती अशी असूनही संशोधन क्षेत्रातली लबाडी बाहेर काढण्याला वाहून घेतलेली काही मंडळी, संघटना, संकेतस्थळे आहेत. पण भ्रष्टाचार इतका आहे की, त्यांचे हात पुरत नाहीत. त्यातून पुरावे जर जोरकस मिळाले नाहीत तर आपल्यावरच बदनामीचे दावे होण्याचा धोका.

SUPERFOOD SWISS CHARD : KNOW THESE 4 BENEFITS OF THIS LEAFY GREEN

Move over, kale, there's a new leafy green in town ready to steal the spotlight! Swiss chard, with its vibrant rainbow stalks and earthy, slightly sweet flavour, is a nutritional dynamo that deserves a starring role on your plate. Swiss chard not only tantalises the taste buds but also serves as a vital ally in promoting overall health. Let's delve deeper into the 5 remarkable benefits that make Swiss chard a superfood worth celebrating. Nutrient richness: Swiss chard doesn't just fill your plate with greens; it enriches your body with a bounty of essential nutrients. Laden with vitamins A, C, and K, this leafy green also delivers a significant dose of vital minerals, including magnesium, potassium, and iron. The synergistic blend of these nutrients contributes to a robust immune system and supports various bodily functions. Bone nourishment: For those seeking robust bone health, Swiss chard emerges as a natural ally. Abundant in vitamin K, this superfood plays a crucial role in calcium absorption and utilisation. By incorporating Swiss chard into your diet, you provide your bones with the support they need, reducing the risk of osteoporosis and ensuring skeletal strength. Heart health boost: One of Swiss chard's standout attributes is its ability to foster cardiovascular wellness. The abundance of potassium aids in maintaining optimal blood pressure levels, promoting a heart-friendly environment. Moreover, the presence of dietary fibre plays a pivotal role in supporting healthy cholesterol levels, fortifying your heart against potential risks. Blood sugar harmony: Balancing blood sugar levels becomes more achievable with the inclusion of Swiss chard in your meals. The combination of fibre and antioxidants facilitates better blood glucose control, making this leafy green a valuable addition for individuals managing diabetes or those keen on preventing its onset. Weight management ally: Swiss chard's low-calorie content and high nutrient density position it as a valuable asset for those navigating the path of weight management. The fibre content induces a sense of fullness, curbing overeating tendencies and supporting weight loss or maintenance goals.

भूमी पेडणेकरला वेध लागले डिजिटलचे, म्हणते 'आजवर केलेल्या चित्रपटांपेक्षा...'



अभिनयात पदार्पण केल्यापासून आपल्या वैविध्यपूर्ण भूमिकांद्वारे भूमी पेडणेकर ने हिंदी सिनेसृष्टीत आपलं एक वेगळे स्थान निर्माण केले आहे. मागच्या वर्षी भूमी पेडणेकरचे 'भीड', 'अफवाह', 'थँक यू फॉर कॉलिंग' आणि 'लेडी किलर' हे चार चित्रपट प्रदर्शित झाले आहेत.

यंदा तिचे 'भक्षक' आणि 'मेरी पत्नी का रिमेक' हे दोन सिनेमे बॉक्स ऑफिसवर रिलीज होणार आहेत, पण भूमी पेडणेकरला मात्र डिजिटलचे वेध लागले आहेत. भूमी पेडणेकर सध्या डिजिटल प्रोजेक्टच्या शोधात आहे. याबाबत ती म्हणाली की, जागतिक स्तरावर तसेच भारतात स्ट्रीमिंग कंटेंटची लोकप्रियता अविश्वसनीय आहे. मागील बऱ्याच दिवसांपासून मी डिजिटलवर एन्ट्री करण्याचा विचार करत आहे, परंतु स्ट्रीमिंगवर माझं पदार्पण रोमांचक तसंच लक्षवेधी असावं असंही मला वाटतं. आजवर केलेल्या चित्रपटांपेक्षा ते काहीतरी वेगळं आणि भन्नाट असायला हवे.

ती पुढे म्हणाली की, एक प्रेक्षक म्हणून, मला खरोखर विश्वास आहे की प्लॅटफॉर्म आणि त्यांनी मांडलेला आशय देखील चांगला आहे. एक लांबलचक स्वरूप एखाद्या कलाकाराला त्यांच्या व्यक्तिरेखेमध्ये खऱ्या अर्थाने राहण्याची आणि खरोखरच प्रतिष्ठित असू शकेल असे काहीतरी तयार करण्याची संधी देते. मी बंयाच शोजची फॅन आहे आणि समोर येणाऱ्या सर्व कंटेंटची मी प्रेक्षक आहे. मी सकारात्मक आहे की मला काहीतरी सापडेल ज्यावर माझा विश्वास आहे.

थायरॉईडमध्ये औषधांपेक्षा ही 5 फळे गुणकारी, हार्मोन्सला कंट्रोलमध्ये ठेवतात



सध्या लोकांमध्ये थायरॉईडची समस्या सामान्य झाली आहे. थायरॉईड ही फुलपाखराच्या आकाराची एक छोटी ग्रंथी आहे जी आपल्या गळ्यात असते. ही ग्रंथी थायरॉक्सिन संप्रेरक तयार करते, जे शरीरातील चयापचय दर, वाढ आणि पेशींची दुरुस्ती करण्यास मदत करते.

जर हा हार्मोन नीट काम करत नसेल तर शरीरात अनेक गंभीर समस्या उद्भवू शकतात. थायरॉईडच्या रुग्णांनी त्यांच्या आहाराची विशेष काळजी घ्यावी.

सफरचंद - रोज एक सफरचंद खाल्ल्याने तुम्ही अनेक आजारांपासून दूर राहू शकता. यामध्ये फायबर आणि अँटीऑक्सिडंट मुबलक प्रमाणात असतात, जे शरीराला फ्री रॅडिकल्सपासून वाचवण्यास मदत करतात. थायरॉईडच्या रुग्णांसाठी हे खूप फायदेशीर आहे. याव्यतिरिक्त, हे वजन कमी करण्यास आणि रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यास देखील मदत करते.

पेरू - पेरू फक्त खाण्यासच स्वादिष्ट नाही तर आरोग्यासाठीही खूप फायदेशीर आहे. यामध्ये व्हिटॅमिन-ए, व्हिटॅमिन-बी९, व्हिटॅमिन-सी, व्हिटॅमिन-ई, फायबर, पोटॅशियम, मॅग्नेशियम आणि ओमेगा-3 फॅटी ॲसिड सारखे पोषक घटक असतात. याच्या सेवनाने थायरॉइडच्या समस्यांवर नियंत्रण ठेवण्यास मदत होते. याशिवाय ॲनिमिया आणि डायबिटीजच्या समस्येवरही हे फायदेशीर आहे.

संत्र - थायरॉईडच्या रुग्णांसाठी संत्र्याचे सेवन खूप फायदेशीर आहे. यामध्ये व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट्स मुबलक प्रमाणात असतात. रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यासोबतच थायरॉईड ग्रंथीतील सूजही कमी करते. संत्र्याचे नियमित सेवन केल्यास शरीराला अनेक फायदे मिळू शकतात.

बोरीज - बोरीमध्ये अँटिऑक्सिडंट्स मुबलक प्रमाणात असतात, जे ऑक्सिडेटिव्ह नुकसानापासून पेशींचे संरक्षण करण्यास मदत करतात. ते थायरॉईड संप्रेरकांचे उत्पादन वाढवण्यास आणि वजन कमी करण्यास देखील मदत करतात. थायरॉईडचे रुग्ण त्यांच्या आहारात स्ट्रॉबेरी, ब्लूबेरी आणि रास्पबेरी समाविष्ट करू शकतात.

किवी - थायरॉईडच्या रुग्णांसाठी किवीचे सेवन फायदेशीर आहे. यामध्ये व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट मुबलक प्रमाणात असतात. याच्या सेवनाने रोगप्रतिकारक शक्ती वाढण्यास आणि थायरॉईड नियंत्रित ठेवण्यास मदत होते. हे हृदय निरोगी ठेवण्यासाठी देखील उपयुक्त आहे. याच्या नियमित सेवनाने वजन कमी करण्यासही मदत होते.

अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनात, अध्यक्ष प्रशांत दामलेंनी टोचले सरकारचे कान

100 व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाला उत्साहात सुरुवात झाली. पिंपरी चिंचवड येथे हे संमेलन पार पडत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन झाले. परंपरेनुसार सकाळी नाट्य दिंडीही काढण्यात आली. दिंडीत अनेक कलाकारांनी आणि नाट्यप्रेमींनी सहभाग घेत उत्स्फुर्त प्रतिसाद दाखवला. तर काल पुण्यात नाट्यसंमेलनाचा शुभारंभ झाला. उद्या विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. पुण्यात तब्बल २५ वर्षांनंतर नाट्य संमेलन पार पडत आहे.

पहिल्यांदाच नाट्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषवत असलेले अभिनेते प्रशांत दामलेंनी मनोगत व्यक्त केलं. व्यासपीठावर असलेले मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार, मंत्री उदय सामंत या दिग्गज नेत्यांसमोरच प्रशांत दामलेंनी त्यांच्या खास शैलीतून राजकारण्यांचेच कान टोचले. ते म्हणाले,₹ आम्ही कलाकार फक्त तीन तास नाटक करतो. मंचावर उपस्थित हे ३६५ दिवस २४ तास अभिनयच करत असतात. त्यांच्या कायार्ला सलाम.हे अचानक अध्यक्षपद मिळाल्याने मला मुख्यमंत्री झाल्यासारखं वाटतंय. पण उत्तम गोष्ट ही की माझे सहकारी माझेही बाप आहेत.₹ ते पुढे म्हणाले, 'नाट्यसंमेलन हे कलाकारांसाठी दिवाळी आहे. आपण २२ ठिकाणी नाट्यजागर घेतोय. यामध्ये विविध एकांकिका स्पर्धा, बालनाट्य स्पर्धा आहेत. यामध्ये आतापर्यंत ६७०० रंगकर्मींनी सहभाग नोंदवला आहे. आपण लवकरच १० हजार आकडा पार करू अशी मला आशा आहे.'

अभिनेत्री माधुरी पवारने खरेदी केले नवीन घर

'देवमाणूस', 'तुज्यात जीव रंगला' या आणि अशा अनेक मालिका, रिॲलिटी शोच्या माध्यमातून प्रेक्षकांच्या भेटीला येत असलेली अभिनेत्री म्हणजे माधुरी पवार उत्तम अभिनयशैली आणि नृत्यकौशल्याच्या जोरावर माधुरीने प्रेक्षकांच्या मनात हक्काचं स्थान निर्माण केलं आहे.

परंतु, माधुरीचा हा प्रवास सोपा नव्हता. अत्यंत गरीब कुटुंबातून माधुरी वर आली असून तिने तिच्या हिमतीवर तिचं सारं विश्व निर्माण केलं आहे. माधुरी आज मराठी कलाविश्वातली लोकप्रिय अभिनेत्री म्हणून ओळखली जाते. दरम्यान आता तिने नवीन घर खरेदी केले आहे आणि या घराची झलक व्हिडीओ शेअर करून दाखवली आहे.

अभिनेत्री माधुरी पवार हिने इंस्टाग्रामवर नवीन घराच्या गृहप्रवेशादरम्यानचा व्हिडीओ शेअक करत लिहिले की, नमस्ते वास्तु पुरुषाय भूषाय भिरत प्रभौ मद्गृहं धन धान्यादि समृद्धं कुरु सर्वदा` नवीन घर. स्वप्नपूर्ती. तिच्या या व्हिडीओवर लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव होताना दिसत आहे. कमेंट्समध्ये नेटकरी तिचे खूप कौतुक करत आहेत.

HEALTH AND SPORTS

RAVI SHASTRI AND HIS 'TRACER BULLETS': FIVE OUTRAGEOUS QUOTES FROM INDIA'S FIERY COMMENTATOR AND FORMER HEAD COACH

Dubai: Ravi Shastri is known for his unfiltered and candid commentary style. Whether donning the hat of a commentator or serving as the head coach, Shastri wears his heart on his sleeve and isn't hesitant to express his views. Often dubbed the "voice of cricket," Shastri has remained prominent during significant cricketing events, be it the World Cup finals or the major Test series worldwide.His fiery nature and fearless commentary style have made him a distinctive figure in the cricketing community. Shastri's remarks, at times bordering on the unconventional, have gained him fame on television and social media platforms. Even if it means going too far, his ability to speak his mind has resonated with cricket enthusiasts globally. A recent instance of Shastri's memorable commentary came during a Test match in Cape Town, where he delivered an incredible remark on India's remarkable batting collapse. As the side tumbled from 153/4 to 153 all out, Shastri's words added a touch of drama and candidness. Let's look at five such dramatic quotes from Ravi Shastri during his stints as a commentator and the head coach of the Indian cricket team. During the 2010 edition of the Indian Premier League, Ravi Shastri reserved these lines for Robin Uthappa, who was at the peak of his form then. Uthappa, playing for the Royal Challengers Bangalore in 2010, had smashed 374 runs in 16 matches at a brilliant strike rate of 171.55. Shastri, in his typical style, drew reference to the South Indian dish Uthappam as he lauded Robin Uthappa, further stating that he would be at the "top of the menu."

'WHY NO ROHIT SHARMA?': IND VS PAK T20 WORLD CUP POSTER FEATURING HARDIK PANDYA SPARKS FURORE OVER INDIA CAPTAINCY

NEW DELHI : As the Ajit Agarkar-led selection committee of the BCCI scratch their head over picking the squad for the upcoming three-match T20I series against Afghanistan, the biggest question, that surrounds India's build-up to the 2024 T20 World Cup in June, remains as who will eventually lead the side in the ICC event. While the squad for the Afghanistan contest is unlikely to resolve the long-standing matter, the chief selector is expected to clear the air on it. As the wait continues, a particular poster on the T20 World Cup sparked a furore on social media among the avid followers of the Indian cricket team. On Friday, ICC revealed the fixtures for the 2024 T20 World Cup, which will be co-hosted by the United States of America and the West Indies, and will be held from June 1 to 29. India will begin their campaign against Ireland on June 5 in New York before taking on Pakistan in a blockbuster clash at the same venue. India also have hosts USA and Canada in the same group. Following the big announcement, Star Sports, the official broadcaster of the ICC event, released a poster on the India-Pakistan clash. The picture had the image of Shaheen Afridi, the newly-announced captain of Pakistan, and Hardik represented India. The poster immediately sparked confusion on social media about whether the post confirmed what the eventual announcement would be, whether Rohit has been replaced by the all-rounder for the T20I leadership role, although Hardik has been unofficially has been captaining the side in the former's absence from the format since 2022 T20 World Cup. Ideally, there wouldn't have been a discussion over India's T20I captaincy with Rohit still the official leader in the format. But the veteran opener has been out of action in T20Is since November 2022, when India suffered a semifinal exit against England in Australia. While Rohit, along with Virat Kohli, chose to focus on the ODIs with the 50-over World Cup in 2023, the two did not return after the tournament ended in November. They missed the five-match series against Australia at home and the three-match contest in South Africa. Suryakumar Yadav had led the side in his stead with Hardik out with an ankle injury. It remains to be seen whether Kohli and Rohit will be picked for the Afghanistan series although it has been reported earlier that they are both keen to play in the T20 World Cup in June.

TITAS SADHU INSPIRES INDIA TO A HUGE WIN OVER AUSTRALIA IN 1ST T20I

NEW DELHI : Titas Sadhu was playing her second international game for the senior team when India took on Sri Lanka in the Asian Games final last September. Just 18 years old at the time, the right-arm pacer returned with sensational figures of 3/6 to help her team claim the gold medal. That performance had come eight months after she won the player of the match award in final of the ICC Women's U-19 T20 World Cup. Through the course of the preceding one-off Test and ODI series between the two teams, a familiar sight during India's training sessions was bowling coach Troy Cooley chatting animatedly with Titas. The 58-year-old, who was the bowling coach of the England and Australia men's teams earlier, would stand at the top of the run-up and share insights after every delivery. Endowed with those invaluable lessons, the youngster showed on Friday that she's capable of taking down the best. Titas Sadhu was playing her second international game for the senior team when India took on Sri Lanka in the Asian Games final last September. Just 18 years old at the time, the right-arm pacer returned with sensational figures of 3/6 to help her team claim the gold medal. That performance had come eight months after she won the player of the match award in final of the ICC Women's U-19 T20 World Cup.

'YOU GET SLOW WHEN YOU TURN 35-36, BUT...': GAVASKAR MAKES UNIQUE 'FIELDING' CASE FOR ROHIT, KOHLI'S T20I RETURN

NEW DELHI : The International Cricket Council (ICC) announced this year's upcoming T20 World Cup schedule on Friday. India, like in their previous two World Cup campaigns, have been grouped with Pakistan again; the Asian giants have a reasonably straightforward group and will prime themselves for a spot in the Super 8s. Their opponents in Group A will be Ireland, Canada, and the United States. As the teams build up towards the 20-team World Cup, the cricketing fraternity in India is amid a significant discussion regarding the potential comeback of two batting icons to the T20 format: Virat Kohli and Rohit Sharma. The pair's last appearance for India was in the 2022 T20 World Cup, where the team experienced a semi-final exit. Subsequently, Hardik Pandya assumed the captaincy, albeit without a formal announcement for the T20Is. Rohit Sharma's prolonged absence made Hardik the likely leader for the upcoming T20 World Cup. However, Rohit's potential return has reignited the captaincy discussions. Former India captain Sunil Gavaskar, however, believes that it is paramount for Rohit and Kohli to make a return to the format for the World Cup. Gavaskar stated that besides their batting prowess, the duo remains brilliant on the field, adding further firepower. "Virat Kohli's form has been outstanding for the past 1.5 years. He also played brilliantly at the ODI World Cup. So, there should not be any debate over his batting prowess in limited-overs cricket. A massive aspect is that Rohit Sharma and Virat Kohli are still excellent fielders," Gavaskar told Star Sports during the T20 World Cup schedule announcement on Friday. "Sometimes, you get slow when you are 35-36; your throw isn't that good anymore. So, there are discussions over where to keep you while setting the field. That's not a problem for these two because they are still terrific fielders. In addition to seniority in the dressing room, they will contribute on the field, too. We don't know if Rohit will be captain, but whatever the case, any captain will surely benefit from that," Gavaskar further said. India's next – and their only remaining T20I assignment before the World Cup in June – will begin on January 11 when the side takes on Afghanistan in a three-match series. It is expected that the players' performances in the 2024 Indian Premier League will play a vital role in the squad selection for the World Cup.

DIY HOMEMADE IMMUNITY-BOOSTING CHYAWANPRASH RECIPE

Chyawanprash, a traditional Ayurvedic concoction, has been a staple in Indian households for centuries, celebrated for its incredible health benefits. Renowned for building immunity, it is a herbal jam packed with potent ingredients like Amla (Indian Gooseberry), herbs, and spices. Used as a daily supplement, Chyawanprash is believed to enhance overall well-being, boost energy, and better the body's defense against infections. It's particularly popular during the winter months to combat seasonal illnesses. The beauty of Chyawanprash lies in its adaptability to homemade recipes. Making it at home allows you to control the quality of ingredients, ensuring a preservative-free and natural product. A typical homemade Chyawanprash recipe includes ingredients like Amla, ghee, honey, and an array of beneficial herbs.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore.
• Office contact no. 022-26515151, Mob.9892386748 / 9809386748, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com, Legal Advisor: D. K. Pandey B.A.L.L.B.(High Court Mumbai), (ठाणे न्याय कक्षेत)

ठाण्यातील बेकायदा बांधकामे जमीनदोस्त होणार, आयुक्तांच्या अधिकाऱ्यांना महत्वाच्या सुचना

■ठाणे। प्रतिनिधी,
महापालिका क्षेत्रातील बेकायदा बांधकामे जमीनदोस्त करण्यासाठी १० जानेवारी ते १० फेब्रुवारी अशी महिनाभर विशेष मोहिम राबविली जाणार आहे. संपुर्ण महापालिका क्षेत्रात ही कारवाई केली जाणार असली तरी त्याचा विशेष भर कळवा, मुंब्रा आणि दिवा या भागावर राहणार आहे. या कारवाईच्या पार्श्वभूमीवर आयुक्त अभिजीत बांगर यांनी बैठक घेऊन बांधकाम करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच एमपीडीए अंतर्गत कारवाईचा प्रस्ताव सादर करावा, अशा सुचनाही त्यांनी दिल्या आहेत. महापालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामाबाबत मुख्यमंत्री यांनी तीव्र भावना व्यक्त केल्या आहेत. अनधिकृत बांधकाम म्हणजे नागरिकांच्या सुरक्षेलाही मोठा धोका असतो. त्यामुळे, आपापल्या क्षेत्रातील अनधिकृत बांधकामाचा आढावा घेवून तोडकामाचा कृती आराखडा तयार करावा. स्वतः बांधकाम ठिकाणी उभे राहून तोडकाम करून घ्यावे, असे आदेश आयुक्त बांगर यांनी बैठकीत दिले. ठाणे शहरात कोणतेही अनधिकृत बांधकाम सुरू होऊ नये यावर सर्व सहायक आयुक्तांनी स्वतः लक्ष ठेवावे. अनधिकृत बांधकामांच्या विरोधातील मोहिमांचे संनियंत्रण सहायक आयुक्त करतील. आवश्यकतेप्रमाणे त्यांना अतिरिक्त अधिकाऱ्यांची कुमकही देण्यात येईल. अनधिकृत जोत्याचे बांधकाम तात्काळ तोडण्यात यावे. त्याच ठिकाणी पुन्हा जोत्याचे काम झाले तर जमीन मालकाच्या विरोधात गुन्हा दाखल करावा. जमीन सरकारी मालकीची असेल तर बांधकाम करणाऱ्यावर गुन्हा दाखल करावा. तसेच, एमपीडीए अंतर्गत कारवाईचा प्रस्ताव सादर करावा, असे आदेश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले आहेत. बांधकामाच्या ठिकाणी बोअरवेल केली असेल तर ती तोडावी आणि त्यात दगड टाकून ती बोअरवेल कायमस्वरूपी बुजवावी. तसेच, तोडकामाचा सगळा खर्च हा जमीन मालकाकडून, त्याच्या मालमत्ता करात थकबाकी म्हणून वसूल करावा. डिमांड नोटीस काढून तो खर्च वसूल केला जावा, असे निर्देशही आयुक्तांनी दिले आहेत.

कासा राष्ट्रीय महामार्गावर महालक्ष्मी मंदिराजवळ भीषण अपघात, रिक्षाचालकाचा जागीच मृत्यू

■कासा। प्रतिनिधी,
आज पहाटेच्या सुमारास तलासरी येथील रिक्षाचालक चारोटीकडून तलासरीच्या दिशेने जात असताना महालक्ष्मी मंदिराजवळ अपघात झाला. रिक्षाचालकाने समोर बंद असलेल्या ट्रकला पाहून रिक्षा थांबवली असता, मागून येणाऱ्या ट्रकने रिक्षाला जोरात धडक दिली. या अपघातात रिक्षाचा चुराडा झाला तर रिक्षाचालक अरविंद वाघ (वय ४२ वर्ष रा. तलासरी) यांचा जागीच मृत्यू झाला. आज पहाटे तलासरी येथील रिक्षालाचालक अरविंद वाघ हे वेदांत रुग्णालय येथून भाडे घेऊन विक्रमगडला गेले होते. विक्रमगड येथे रुग्णाला सोडून तलासरीकडे जात असताना महालक्ष्मी मंदिर परिसरात समोर ट्रक उभा असल्याने त्यांनी रिक्षा थांबवली. पाठीमागून येणाऱ्या ट्रकला समोर उभ्या असलेल्या ट्रकचा व रिक्षाचा अंदाज आला नाही. त्यामुळे ट्रकने रिक्षाला जोरात धडक दिली. रिक्षा बंद पडलेला ट्रक व पाठीमागून आलेला ट्रकच्या मध्ये अडकून चेंगरला गेला. या भीषण अपघातामध्ये रिक्षाचालकाचा जागीच मृत्यू झाला. तर रिक्षाचा चुराडा झाला. अपघात झाल्याचे समजताच पोलिसांनी अपघातस्थळी धाव घेत दोन्ही ट्रकचालकांना ताब्यात घेतले व अपघातामध्ये मृत्यू झालेल्या रिक्षाचालकाचा मृतदेह शवविच्छेदन करण्यासाठी कासा उपजिल्हा रुग्णालयात आणला आहे. पुढील तपास कासा पोलीस करत आहेत.

रेल्वे अपघातात २२४ जणांचा बळी; मीरारोड ते वैतरणा स्थानकादरम्यान १५७ जण जखमी

■वसई। प्रतिनिधी,
मिरारोड ते वैतरणा या स्थानकाच्या दरम्यान सातत्याने रेल्वे अपघात होण्याच्या घटना घडत आहे. मागील वर्षभरात या रेल्वे मार्गात २२४ जणांचा अपघातात बळी गेला आहे. तर १५७ जण जखमी झाले आहेत. मिरारोड ते वैतरणा अशी ३१ किलोमीटरची रेल्वे पोलीस ठाण्याची हद्द आहे. यात सात स्थानकांच्या समावेश आहे. मागील काही वर्षांपासून या सर्व स्थानकांतून प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या वाढली आहे.

विशेषतः विरार, नालासोपारा, वसई, नायगाव या स्थानकातून मुंबईच्या दिशेने ये-जा करणाऱ्या प्रवाशांची संख्या अधिक आहे. वाढत्या प्रवाशांच्या गर्दीमुळे काही प्रवासी लोकल मधून लटकून प्रवास करतात. त्यामुळे तोल जाऊन पडण्याचे प्रमाणही अधिक आहे.

तर काही प्रवासी लवकर गाडी पकडण्यासाठी रेल्वे रूळ ओलांडून प्रवास करतात. अशा वेळी लोकलच्या व भरधाव येणाऱ्या एक्सप्रेसच्या धडका लागून अपघात घडत आहेत. २०२३ मध्ये रेल्वे अपघातात २२४ जणांचा मृत्यू झाला आहे. या मृतांमध्ये ५० नैसर्गिक मृत्यू, १२३ प्रवाशांचा ठोकर लागून मृत्यू झाला आहे. ४५ प्रवासी गाडीतून पडून मृत्युमुखी झाले आहेत. ५ जणांनी आत्महत्या केल्या आहेत. तर१५७ प्रवासी रेल्वे अपघातात जखमी झाले आहेत, अशी माहिती वसई रेल्वे पोलिसांनी दिली आहे.

'रेल्वे अपघाताच्या घटना सातत्याने घडत आहेत. यंदा २२४ जणांचा मृत्यू झाला आहे. प्रवाशांनीसुद्धा धोकादायक प्रवास करू नये' - सचिन इंगवले, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, वसई रेल्वे पोलीस ठाणे

१) अपघात व गुन्हेगारी कमी करण्यासाठी प्रयत्न

मागील दोन वर्षांपासून वसई रेल्वे पोलीस ठाण्याच्या हद्दीत अपघात होण्याचे प्रमाण वाढत आहे. तर दुसरीकडे विविध प्रकारचे गुन्हेही घडत आहेत. अपघात व गुन्हे कमी करण्याच्या दृष्टीने रेल्वे पोलिसांकडून प्रवाशांमध्ये जनजागृती करण्यात येणार आहे. यासह इतर उपाययोजना केल्या जाणार आहेत.

२) प्रवाशांच्या दुर्लक्षित पणाचा फटका

रेल्वेतील होणारे अपघात रोखण्यासाठी प्रवाशांसाठी पादचारी पूल, सरकते जिने, संरक्षण जाळ्या, भुयारी मार्ग अशी व्यवस्था केली आहे. परंतु काही प्रवासी रेल्वे रूळ ओलांडून प्रवास करण्याचा प्रयत्न करतात.

आईला म्हणाली घरी उशिरा येईन, मात्र लेक पुन्हा परतलीच नाही, वाटेतच सारं हरवलं...

■नवी मुंबई। प्रतिनिधी,
शहरामध्ये तसेच आजूबाजूच्या परिसरामध्ये रस्त्यांवर अपघात होण्याचे प्रमाण हे दिवसेंदिवस वाढत चालले आहे. या अपघातांमध्ये अनेकवेळा काही व्यक्तींना जीव देखील गमवावे लागतात. नवी मुंबई पनवेलच्या बाजूला असलेल्या दरवाजा परिसरामध्ये बाईक वरून जाणाऱ्या तरुणीचा पडून मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. अनेक वेळा भरधाव वेगाने गाड्या चालवतात आणि अपघाताला आमंत्रण देतात. मात्र, यामध्ये नाहक प्रवाशांचे जीव गमावलेले पाहायला मिळतात. तळोजा परिसरामध्ये २३ वर्षे असलेल्या तरुणीचा गाडीवरून पडून मृत्यू झाल्याने आजूबाजूच्या परिसरामध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे. ही तरुणी मित्रासोबत मोटारसायकलवरुन घरी जात असताना रस्त्यावर पडल्याने गंभीर जखमी झाली. त्यात तिचा मृत्यू झाल्याची घटना तळोजा-कल्याण रोडवर घडली. या घटनेतील मृत तरुणीच्या मित्राने भरधाव वेगात मोटारसायकल चालवून नेल्याने मोटारसायकलवर पाठीमागे बसलेली तरुणी खाली पडून तिचा मृत्यू झाल्याचं आढळून आले आहे. त्यामुळे तळोजा पोलिसांनी या अपघाताला जबाबदार धरुन मृत तरुणीच्या मित्राविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

या अपघातात मृत झालेल्या तरुणीचे नाव शैफिता मुस्ताक खान (२३) असे असून ती कल्याण पलावा येथील मारवेला सोसायटीत आई वडील आणि भावंडासह राहत होती. शैफिता ही चेंबुर येथील आयटी कंपनीत काम करत होती. सकाळी ७ वाजता ती कामावर जाऊन रात्री १० वाजता घरी परतत होती. सकाळी शैफिता नेहमीप्रमाणे आपल्या कामावर गेली होती. त्यानंतर रात्री ९ च्या सुमारास शैफिताने आपल्या आईला फोन करुन कामावरुन घरी येण्यास तिला उशीर होणार असल्याचे आईला सांगितले होते. त्यानंतर रात्री साडे दहा वाजण्याच्या सुमारास शैफिता ही आपला मित्र सुफियान सलीम कुरेशी (२८) याच्यासोबत त्याच्या मोटारसायकलवरून आपल्या घरी परतत होती. यावेळी त्यांची मोटारसायकल तळोजा एमआयडीसीतील नावडे फाटा कल्याण रोडवरील महानगर गॅस पंपाजवळ आली असताना, शैफिताचा तोल गेल्याने ती मोटारसायकलवरुन खाली पडली. त्यामुळे तिच्या डोक्याला दुखापत होऊन ती गंभीर जखमी झाल्याने सुफियान याने तीला कामोठे येथील एमजीएम हॉस्पीटलमध्ये दाखल केले. मात्र, तेथील डॉक्टरांनी तिला मृत घोषीत केले. या अपघातानंतर तळोजा पोलिसांनी या अपघाताला मृत शैफिताचा मित्र सुफियान कुरेशी याला जबाबदार धरुन त्याच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

नवी मुंबई सिडको प्रकल्पग्रस्त महासंघाची दिबांच्या जासई या जन्मूभीत स्थापना

■उरण। प्रतिनिधी,
शेतकरी प्रकल्पग्रस्त व स्थानिक भूमीपुत्र यांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यांना न्याय देण्यासाठी सर्व भूमिपुत्रांच्या संघटनांनी एक होऊन प्रकल्पग्रस्तांचे नेते माजी खासदार दि.बा. पाटील यांचे भूमिपुत्रांना न्याय देत त्यांचे प्रलंबित प्रश्न सोडवण्याचे आवाहन महासंघाचे अध्यक्ष कॉ. भूषण पाटील यांनी जासई मधील स्थापना समितीच्या बैठकीत केले. यावेळी त्यांनी महासंघाच्या वतीने पुढील काळातील आंदोलनाची घोषणा करण्यात आली. त्याचप्रमाणे पंतप्रधानांनी दि. बा. पाटील यांच्या विमानतळाच्या नावाची घोषणा करण्याचीही मागणी त्यांनी यावेळी केली.

शेतकरी आणि प्रकल्पग्रस्तांच्या समस्यावर महासंघअंतर्गत संघटनेच्या वतीने राज्याचे मुख्यमंत्री व सिडकोच्या व्यवस्थापकीय संचालकांना नोटीस देण्यात आली आहे.

यामध्ये २० फेब्रुवारी ला ९५ गावांचे महाधरणे आंदोलन सिडको भवन समोर ४ ते १६ मार्चला सिडकोभवनला साखळी उपोषण करण्यात येईल. तर १७ मार्च या सिडकोच्या स्थापना दिनी सिडको भवन ते मंत्रालय लॉंगमार्च काढण्यात येणार असल्याची माहिती महासंघाचे अध्यक्ष कॉ. भूषण पाटील,कार्याध्यक्ष दीपक पाटील, सरचिटणीस सुधाकर पाटील, सरचिटणीस, उपाध्यक्ष एड. विजय गडगे, समन्वयक एड. दीपक ठाकूर, यांनी दिली आहे. यावेळी जासई बैठकीत कामगार नेते सुरेश पाटील,वंदना गौरीकर आदीजण उपस्थित होते.

फेरीवाल्यांची दादागिरी; मिरा-भाईंदर महापालिका अधिकाऱ्याला मारहाण

■मिरा-भाईंदर। प्रतिनिधी,
मिरारोडच्या शांती नगरमधील फेरीवाल्यांवर कारवाईसाठी गेलेल्या महापालिका अधिकाऱ्याला मारहाण करण्यात आल्याची घटना गुरुवारी रात्री घडली आहे. याप्रकरणी १७ फेरीवाल्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

येथे स्थानिक व्यापारी विरुद्ध फेरीवाले असा वाद मागील काही महिन्यांपासून सुरू आहे. मिरारोड रेल्वे स्थानकालगत असणाऱ्या शांती नगर भागात रस्त्यावर व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यांमुळे चालणेही अनेकदा कठीण होते. म्हणून येथील फेरीवाल्यांवर कारवाई करण्याची मागणी स्थानिक व्यापाऱ्यांनी मागील तीन महिन्यांपासून लावून धरली आहे.

त्यानुसार येथील फेरीवाल्यांवर नियमित महापालिका प्रशासनाकडून कारवाई केली जात आहे. गुरुवारी रात्रीही कारवाईसाठी महापालिकेचे पथक पोहोचले होते. यावेळी आक्रमक झालेल्या फेरीवाल्यांच्या जमावाने अतिक्रमणविरोधी पथक प्रमुख नरेंद्र चव्हाण यांना धक्काबुक्की करून मारहाण केली. तत्पूर्वी मंगळवारीही काही फेरीवाल्यांनी सहाय्यक आयुक्त स्वप्नील सावंत यांना मारहाण केली होती.

येथे न्यायालयाच्या आदेशानुसार अधिकृत रीत्या व्यवसाय करत असतानाही व्यापाऱ्यांच्या मागणीनुसार ही कारवाई केली जात असल्याने फेरीवाल्यांमध्ये नाराजी आहे.

ठाणे जिल्ह्याला भरली हुडहुडी सरासरी तापमान १५ अंश सेल्सिअसपर्यंत खाली

■बदलापूर। प्रतिनिधी,
गेल्या काही दिवसांपासून ठाणे जिल्ह्यात तापमानाचा पारा खाली आल्याचे दिसून आले आहे. शुक्रवारी जानेवारी यंदाच्या वर्षातील सर्वात कमी तापमानाची नोंद ठाणे जिल्ह्यातील बदलापूर शहरात झाली. बदलापुरात १४.५ अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली.

त्या खालोखाल कल्याण, ठाणे या शहरात अनुक्रमे १६.५ आणि १७.५ अंश सेल्सियची नोंद झाली. पारा घसल्याने जिल्ह्यात धुकेही पसरल्याचे दिसून आले. त्याचा रेल्वे आणि रस्ते वाहतुकीवरही परिणाम जाणवला. शुक्रवारी ठाणे जिल्ह्यातील सर्वच शहरांमध्ये तापमानात घट दिसून आली. गेल्या काही दिवसांपासून थंडीला पोषक वातावरण असल्याने थंडी जाणवते आहे. शुक्रवारी जिल्ह्यात सरासरी तापमान १५ अंश सेल्सियसवर आले होते. ठाणे जिल्ह्यात बदलापूर शहरात सर्वात कमी म्हणजे १४.५ अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. यापूर्वी डिसेंबर महिन्यात बदलापुरात १४ अंश सेल्सियस तापमान नोंदवले गेले होते. मात्र गेल्या वर्षाच्या तुलनेत यंदा अजुनही थंडीचा तसा कडाका जाणवलेला नाही.

जिल्ह्यात कल्याण शहरात १६.५ अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. तर ठाणे शहरात १७.५ अंश सेल्सियस तापमान नोंदवले गेले. तापमानात घट झाल्याने ठाणे जिल्ह्याला हुडहुडी भरली होती. शुक्रवारी घटलेल्या तापमानासह हवेतही धुके पसरले होते. त्यामुळे अनेक रस्ते, उंच इमारती धुक्यात गुडूप झाल्या होत्या. धुक्यामुळे रेल्वे आणि रस्ते वाहतुकीवरही काही काळ परिणाम जाणवला. आणखी दोन दिवस अशाच प्रकारी थंडीचे असतील अशी माहिती खासगी हवामान अभ्यासकांनी दिली आहे.

कडाक्याची थंडी संक्रांतीनंतरच

सध्या अरबी समुद्रात कमी दाबाचा पट्टा तयार झाल्याने आणि दक्षिणेतून येणाऱ्या दमट वाऱ्यांमुळे ७ जानेवारीनंतर पुन्हा तापमानात वाढ झाल्याचे दिसून येईल. तसेच थंडी काही अंशी कमीही होईल. मात्र मकर संक्रांतीनंतर थंडीसाठी पोषक वातावरण असणार आहे. त्यामुळे त्यानंतर पारा आणखी खाली जाईल आणि चांगली थंडी जाणवेल, अशी माहिती खासगी हवामान अभ्यासक अभिजीत मोडक यांनी दिली आहे.

पडघ्यात वर्षभर पाणीटंचाई; दोन दिवसांतून एकदा मिळते अपुरे आणि अशुद्ध पाणी

■ठाणे। प्रतिनिधी,
मुंबई आणि ठाण्याला पाणीपुरवठा करणाऱ्या वितरण व्यवस्थांच्या जवळ असून भिवंडी तालुक्यातील पडघा गावातील रहिवाशांना बाराही महिने पाणी टंचाईला सामोरे जावे लागते. सध्या ग्रामपंचायतीकडून चालवल्या जाणाऱ्या योजनेतून गावाला दर दोन दिवसांनी एकदा तेही अपुरे आणि अशुद्ध पाणी मिळते. त्यामुळे ग्रामस्थांना पिण्यासाठी विकतचे बाटलीबंद पाणी वापरावे लागते.

मुंबई-नाशिक महामार्गालगत असलेले पडघा हे पूर्वापार पंचक्रोशीतील अनेक गावांची मुख्य बाजारपेठ असणारे गांव आहे. गोदामांमुळे गावातील लोकसंख्या कैकपटींनी वाढली. त्या तुलनेत गावाला पाणी पुरवठा करण्यासाठी सध्या अस्तित्वात असलेली योजना अत्यंत अपुरी आणि सदोष आहे. सध्या गावात दोन दिवसांआड पाणी येते. ते पाणी गावकरी भरून ठेवून इतर कामांसाठी वापरतात. पिण्यासाठी मात्र त्यांना विकतचे बाटलीबंद पाणी वापरावे लागते. गावापासून तीन किलोमीटर अंतरावर भातसा नदी आहे. या नदीवरील भातसा धरणातून मुंबईला पाणी पुरवठा होतो. तानसा आणि वैतरणा धरणेही येथून २५ किलोमीटर अंतरावर आहेत, पण भिवंडी तालुक्यातील अनेक गावांना पुरेसे पाणी मिळत नाही. पडघा हे त्यातील एक ठळक उदाहरण आहे. १९५६ मध्ये जेव्हा मुंबई महापालिकेकडून पडघा गावात पाणीपुरवठा केला जात होता, तेव्हा पाणीसमस्या नव्हती.

आई-वडील फोन घेत नाही, घरी गेला तर दार अर्धवट उघडलेलं अन् आत भयंकर दृश्य, पाहताच लेक किंचाळला

■ठाणे। प्रतिनिधी,
घरात ज्येष्ठ दाम्पत्य मृतावस्थेत आढळल्याचा प्रकार ठाण्यातील चितळसर-मानपाडा परिसरात समोर आला आहे. या दाम्पत्याची हत्या झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला असून या प्रकरणी चितळसर पोलिस ठाण्यात हत्येचा गुन्हाही दाखल झाला आहे. परंतु, दाम्पत्याचा मृत्यू नेमका कसा झाला, याबाबत शवविच्छेदन अहवाल आल्यानंतर समजेल, अशी माहिती पोलिसांनी दिली. समशेर बहादुर रणबाज सिंग (६८), मीना (६५) अशी मृतांची नावे आहेत. चितळसर येथील एमएमआरडीएच्या इमारत क्रमांक एकमध्ये राहणारे समशेर सुरक्षारक्षकाची नोकरी करत होते. त्यांच्या पत्नी घरातूनच दूधविक्रीचा व्यवसाय करत होत्या. अंबरनाथ येथे वास्तव्यास असलेला आणि खासगी कंपनीत काम करणारा या दाम्पत्याचा मुलगा सुधीर सिंग याने बुधवारी रात्री आई-वडिलांना फोन करून त्यांच्या प्रकृतीची चौकशी केली. दुसऱ्या दिवशी गुरुवारी दुपारी सुधीर पुन्हा आई-वडिलांना फोन करण्याचा प्रयत्न करत होता. मात्र, वडिलांचा मोबाइल फोन बंद होता. आईच्या मोबाइची रिंग वाजत होती, परंतु संपर्क होत नव्हता. संध्याकाळी कामावरून सुटल्यानंतर सुधीर आई-वडिलांच्या घरी आला. त्यावेळी घराचा मुख्य दरवाजा अर्धवट उघडा होता. तो घरात गेला असता, वडील सोफ्यावर, तर, आई बेडवर असल्याचे निदर्शनास आले. या दोघांना त्याने उठवण्याचा प्रयत्न केला.

खारकोपर-उरण मार्गाची रेल्वेच्या मुख्यकार्यकारी अधिकऱ्यांकडून पाहणी

■उरण। प्रतिनिधी,
खारकोपर ते उरण दरम्यानच्या लोकल मागार्ची शनिवारी सकाळी रेल्वेचे कार्यकारी अधिकारी यांनी परख या तपासणी वाहनाद्वारे पाहणी केली. त्यामुळे येत्या १२ जानेवारीला पंतप्रधानांच्या हस्ते होण्याची चिन्हे निर्माण झाली आहे.

रेल्वेकडून झालेली पाहणी ही हा मार्ग सुरू होण्याची आशा पल्लवीत करणारी ठरणार आहे. शनिवारी सकाळी ११.३० वाजता उरणच्या रेल्वे स्थानकांत हे विशेष तपासणी वाहन दाखल झाले.

यावेळी रेल्वेचे मुख्यकार्यकारी अधिकारी अविनाश पांडे यांनी खारकोपर ते उरण या मार्गावरील स्थानकांची पाहणी केली आहे. या रेल्वेच्या पाहणी दौऱ्यामुळे खारकोपर ते उरण रेल्वे मार्ग सुरू होण्याची आशा पल्लवीत झाल्या आहेत.

राज्यातील बेकायदेशीर वाहन घोटाळा प्रकरण, उपप्रादेशिक परिवहन विभागाकडून वसईत ४ वाहने जप्त

■वसई। प्रतिनिधी,
वाहन घोटाळ्याप्रकरणी विरारमध्ये गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर प्रादेशिक परिवहन विभागाने वाहनांची तपासणी सुरू केली आहे. आतापर्यंत परिवहन विभागाने एकूण ४ वाहने जप्त केली आहेत. त्यात २ बस आणि २ मालवाहतूक करणाया वाहनांचा समावेश आहे. वसई विरार शहरात अशा प्रकारची ६० हून अधिक वाहने असल्याचा संशय असून त्याचा प्रादेशिक परिवहन विभागामार्फत शोध घेण्यात येत आहे. खासगी बसेसची परराज्यांतून बेकायदेशीरपणे नोंदणी करून ती वापरात आणल्याचा एक प्रकार नुकताच वसई विरार शहरात उघडकीस आला होता. अशाप्रकारची अनेक बेकायदेशीर वाहने रस्त्यावर धावत असल्याची तक्रार उपप्रादेशिक परिवहन विभागाने केली होती. भंगारात गेलेली वाहने दुरूस्त करून किंवा चोरीच्या इंजिनाच्या आधारे पुनर्निमाण करून आणली जात असण्याची शक्यता आहे. सर्वच शहरात अशी वाहने असून या गुन्ह्याची व्याप्ती राज्यभर पसरली आहे. याप्रकरणी विरार पोलिसांकडून एका बसचा मालक प्रवीण राऊत याच्याविरोधात फसवणुक तसेच बनवाट दस्तावेज बनविल्याप्रकरणी कलम ४२०, ४६५, ४६६, ४६७, ४६८, ४७१, १२० ब अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. हे प्रकरण उघडकीस आल्यानंतर प्रादेशिक विभाग सावध झाला आहे. वाहनांची कसून तपासणी करण्यास सुरूवात करण्यात आली होती. सुमारे शहरात ६० बेकायदेशीर वाहने धावत असल्याचे परिवहन विभागाकडून सांगण्यात येत आहे. या तपासणी दरम्यान ४ बेकायदेशीर नोंदणी असलेली वाहने सापडली असून ती जप्त करण्यात आली आहेत. यात दोन खासगी बसेस व दोन टिप्पर वाहनांचा समावेश आहे. जशी जशी वाहने आढळून येत आहेत त्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे. वाहनांची नोंदणी प्रादेशिक परिवहन कार्यालयातून (आरटीओ) केली जाते. वाहनांची नोंदणी करता त्याचे इंजिन आणि चेसीस क्रमांक तपासले जाते आणि मग अधिकृत नोंदणी करून क्रमांक दिला जातो. राज्यात ८ वर्ष जुन्या वाहनांवर बंदी आहे. त्यामुळे ही भंगार झालेली वाहने परराज्यात फेरफार करून नोंदणी करून राज्यातील रस्त्यावर आणली जात असल्याची एक शक्यता आहे.

उरणच्या शाळेत विद्यार्थ्यांना आसाराम बापूची पुस्तके वाटली, पालकांनी विचारलं तर म्हणे 'आम्हाला वरून 'आदेश!'

■नवी मुंबई। प्रतिनिधी,
बलात्काराच्या गुन्ह्यात शिक्षा भोगत असलेल्या आसाराम बापूचा पुळ्का नवी मुंबईतील उरणमधल्या एका शाळेला आलाय. चक्क आसाराम बापूची पुस्तके विद्यार्थ्यांना वाटून त्यावर परीक्षा घेण्याची तयारी मुलांकडून करून घेत असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. त्यामुळे आसाराम बापूविषयी अभ्यास करायला लावून मुलांवर कोणते संस्कार शाळेला करायचे होते? असा प्रश्न उपस्थित होतोय.

बलात्काराच्या गुन्ह्यासाठी आजन्म कारावास भोगत असलेल्या आसाराम बापूचे 'संस्कार सरिता' नावाचे पुस्तक उरण येथील 'जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूट'च्या पूर्व प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना वाटून त्यावर आधारित परीक्षा घेणार असल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. विशेष म्हणजे ह्या शाळेतील काही विद्यार्थ्यांना आसाराम बापूचे 'संस्कार सरिता' हे पुस्तक देण्यात आले होते आणि त्यावर आधारित इयत्ता तिसरी ते इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्यात येणार होती.

यासाठी तीन वयोगट ठरविण्यात आले होते. जो विद्यार्थी ६० टक्के प्राप्त करेल त्याची जिल्हास्तरीय निवड होणार असल्याचे सांगण्यात आले होते आणि जिल्हास्तरीय टॉपमध्ये ६ विद्यार्थ्यांची निवड करून, प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्याला २१ हजार, द्वितीय येणाऱ्यास १५ हजार, तृतीय क्रमांकास ११ हजार, चतुर्थ क्रमांकास सात हजार, पाचव्या क्रमांकास ५ हजार, सहाव्या क्रमांकास ३ हजार अशी पुरस्कारांसाठीची रक्कम ठरवलेली होती. मात्र जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूट ह्या शाळेत सेमी इंग्लिशने शिकणाऱ्या इयता तिसरीच्या विद्यार्थीनींच्या पालकांच्या निदर्शनास ही बाब येताच त्यांनी लगोलग शाळेशी संपर्क साधला. प्रिन्सिपलसोबत (मुख्याध्यापक) भेटून चर्चा केली. त्यावर वरून आदेश आहेत, मी काहीही करू शकत नाही, असे उत्तर प्रिन्सिपल यांच्याकडून देण्यात आल्याचं पालकांनी सांगितलं.

पालकांच्या प्रश्नांनंतर पुस्तके जमा केली मुख्याध्यापकांच्या या उत्तरानंतर पालकांनी निराश न होता पुन्हा शाळेच्या दादर येथील संस्थेशी संपर्क केला असता दुसऱ्या दिवशी विद्यार्थांना दिलेली पुस्तक शाळेने पुन्हा जमा करायला सांगितली.

भाजप, अजित पवार मित्र मंडळाच्या सांगण्यावरून 'ईडी'ची कारवाई; आमदार रोहित पवार यांचा गंभीर आरोप

■पिंपरी। प्रतिनिधी,

बारामती ॲग्रोमध्ये कोणतेही चुकीचे काम झाले नाही. अंमलबजावणी संचानलायाच्या (ईडी) अधिकाऱ्यांच्या लिखित, तोंडी प्रश्नांना उत्तरे दिली आहेत. मला नोटीस आली नाही, जेव्हा येईल, तेव्हा मी त्यांच्या कार्यालयात जाऊन माहिती देईल. गेल्या सात दिवसात भाजप आणि अजित पवार मित्र मंडळाचे कोण कोण दिल्लीला गेले होते, त्यांच्या प्रवासाची माहिती काढा, यावरून सर्व गोष्टी कळतील असे सांगत त्यांच्या सांगण्यानुसारच कारवाई झाल्याचा आरोप शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी अप्रत्यक्षपणे चिंचवडमध्ये केला. ज्यांच्यावर भाजपने आरोप केले होते. त्यांच्यावरील कारवाया का थांबवण्यात आल्या आहेत? असा सवालही रोहित पवार यांनी केला.

राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष तुषार कामठे, रविकांत वरपे, सुनील गव्हाणे यावेळी उपस्थित होते. रोहित पवार म्हणाले की, कारवाई होत असताना मी विचार, बाजू बदलणार नाही. मी भारताच्या बाहेर होतो. शुक्रवारी सकाळी कारवाई झाली. मी खरंच काही चुकीचे केले असते तर काल रात्री मी भारतात आलो नसतो. अजून पंधरा दिवस बाहेर राहिलो असतो. यापूर्वी ज्यांच्यावर ह्यईडीह्नची कारवाई झाली ते लोक दिल्लीला कोणाला तरी भेटायला गेले आहेत, नाही तर पक्ष बदल केले आहेत. मी घाबरलो नाही, मला याची सहानुभूतीही घ्यायची नाही. कारवाई का, कशी केली हे लोकांना माहिती आहे. यात अधिका-यांचे कुठेही काही चुकत नाही. त्यांना काही गोष्टी सांगितल्या जातात, त्या पद्धतीने ते येतात. कागदपत्रांची तपासणी करतात. कोणती कागदपत्रे जप्त केली याची माहिती माध्यमापर्यंत कशी गेली, यावरुनच काहींना राजकारण करायचे असल्याचे दिसते.

भाजपचे सरकार असताना गुन्हे अन्वेषण विभाग (सीआयडी), आयकर, उत्पादन शुल्क विभागाची कारवाई झाली आहे. माझा विषय मोठा दाखविण्याचा प्रयत्न करत आहेत. गेल्या सात दिवसात भाजपचे आणि अजित पवार मित्र मंडळाचे कोण कोण दिल्लीला गेले होते, त्यांच्या प्रवासाची माहिती काढा, यावरून सर्व गोष्टी कळतील. मी चूक केली असती तर अजित पवार यांच्यासोबत जाऊन बसलो असतो. पण, मी गेलो नाही आमच्यासाठी विचार महत्वाचा आहे. आम्ही लढत आहोत. तसेच महाराष्ट्र शिखर बँकेचा घोटाळा कधी, कसा झाला. राजकीय लोक बँकेवर असताना कोणत्या कंपन्या कोणाला विकल्या गेल्या हे बघावे. त्या यादीत कोणत्या नेत्यांची नावे आहेत, ती एक यादी सत्तेतील लोकांनी प्रसिद्ध करावी. त्यातील कोणाची चौकशी चालू होती आणि ती माणसे आज त्याच पक्षात आहेत की भाजपसोबत आहेत हे पहावे. भाजपकडे येण्यापूर्वी ज्या नेत्यांवर भाजपचे लोक बोलत होते, त्या कारवाईचे काय झाले. त्यांनी केलेल्या चुकांचे काय झाले. सामान्य जनता या सर्व गोष्टी डोळे उघडे ठेवून बघत आहे. विरोधात असलेल्या नेत्यांवर का कारवाई केली जाते हे जनतेला माहिती आहे. भाजपचे आमदार सुनील कांबळे यांनी अजित पवार यांच्यासमोर त्यांच्या गटातील पदाधिकारी, पोलीस कर्मचाऱ्याला मारले. त्यावर ते काहीच बोलले नाहीत, असा सवालही रोहित पवार यांनी केला.

देवेंद्र फडणवीस ज्या शहरात जातात त्यादिवशी तिथे खून होतो

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ज्या दिवशी,ज्या शहरात असतात. त्यादिवशी तिथे भरदिवसा खून होत आहेत. फडणवीस यांच्यावर कामाचा ताण वाढला आहे. त्यांनी उपमुख्यमंत्री पद बाजूला ठेवावे आणि गृहमंत्री पदाला न्याय द्यावा नाही तर राजीनामा द्यावा, असेही ते म्हणाले.

दारू कारखाना रद्द करण्याचा आदेश काढा, पद्मश्री डॉ. अभय बंग यांची मागणी

■नागपूर। प्रतिनिधी,

गडचिरोली जिल्ह्यातील प्रस्तावित दारू कारखाना रद्द करण्याचा शासकीय आदेश राज्य सरकारने काढावा, अशी मागणी जिल्हा दारुमुक्ती संघटनेचे अध्यक्ष पद्मश्री डॉ. अभय बंग यांनी शनिवारी पत्रपरिषदेत केली. गडचिरोली जिल्ह्यात तीस वर्षांपासून दारुबंदी आहे. गेल्या सात वर्षांपासून येथे राज्य टास्क फोर्स अंतर्गत दारू व तंबाखुमुक्तीसाठी 'मुक्तिपथ' हा जिल्हाव्यापी पथदर्शी प्रकल्प सुरू आहे. त्या अंतर्गत दारू व तंबाखूचे प्रमाण बरेच कमी झाले आहे. मात्र, १० डिसेंबर २०२३ रोजी जिल्ह्यातील जनतेला अंधारात ठेवून गडचिरोलीत मोहफुलापासून दारू बनविण्याच्या कारखान्याचे भूमिपूजन करण्यात आले. त्यानंतर लगेच दुसऱ्या दिवशी ११ डिसेंबरला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हिवाळी अधिवेशनादरम्यान दोन्ही सभागृहात गडचिरोली जिल्ह्यात दारू निर्मितीचा कारखाना होणार नाही', असे आश्वासन दिले. परंतु, याबाबतचा शासकीय आदेश अद्याप निघालेला नाही. तो लवकरात लवकर काढावा, अशी मागणी याप्रसंगी डॉ. अभय बंग यांनी केली.

कोकणच्या विकासासाठी कोकण प्रादेशिक पक्षाची घोषणा; नोंदणीसाठी भारतीय निवडणूक आयोगाकडे अर्ज

■मुंबई। प्रतिनिधी,

निसर्गरम्य, जैव संपत्तीचा खजिना असूनही कोकणला अविकासाचा शाप लागला आहे. स्वातंत्र्यापासून कोकणी माणूस उपेक्षितच राहिला आहे. विकासापासून वंचित राहिला आहे, कोकणातील माणसाची राजकीय सामाजिक आर्थिक सांस्कृतिक व कोकणातील युवकांसाठी रोजगारनिर्मितीचे मुख्य उद्दिष्ट ठेवून नवीन 'कोकण प्रादेशिक पक्ष' या नव्या राजकीय पक्षाची शुक्रवारी घोषणा करण्यात आली.

कोकणातील कोकणी माणसाचा आवाज बुलंद होण्यासाठी आणि त्यांच्या समस्या या शासन दरबारी मांडण्यासाठी राजकीय पक्षांना अपयश येत आहे. त्यामुळे सामाजिक बांधिलकी म्हणून आणि उच्चशिक्षित मंडळी एकत्र येत कोकण प्रादेशिक पक्ष या नावाने नवीन पक्ष स्थापन केला जात आहे असल्याची माहिती शुक्रवारी मुंबई प्रेस क्लब या ठिकाणी करण्यात आली. २७ डिसेंबर रोजी पक्षाच्या नोंदणीसाठी भारतीय निवडणूक आयोगाकडे अर्ज करण्यात आला आहे. पक्षाच्या केंद्रीय कमिटीचे पदाधिकारी निवडण्यात आले आहेत.

ॲड. ओवेस अन्वर पेचकर (संयोजक), ॲड. वैभव वसंत हळदे (सह संयोजक), ॲड. शुभम सुरेश उपाध्याय (सरचिटणीस), सीए नावीद अब्दुल सईद मुल्ला (खजिनदार) या पदाधिकाऱ्यांचा कमिटीमध्ये समावेश आहे. कोकण प्रादेशिक पक्षाची केंद्रीय कमिटी १० ते १२ जानेवारी २०२४ या कालावधीत कोकणाचा दौरा करणार आहेत. कोकणातील रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील जिल्हा कमिटींची नियुक्ती केली जाणार आहे. जानेवारीच्या तिसऱ्या आठवड्यात कोकणातील नवी मुंबई, ठाणे, पालघर, मुंबई आणि मुंबई उपनगरमधील जिल्हा कमिटी निवडल्या जाणार आहेत.

कोकण प्रादेशिक पक्ष आगामी लोकसभा निवडणुकीत १२ जागांवर उमेदवार उभे करणार आहे.

नाशिकमध्ये युवक महोत्सवानिमित्त विशेष स्वच्छता मोहीम

■नाशिक। प्रतिनिधी,

शहरात १२ जानेवारी रोजी होणाऱ्या राष्ट्रीय युवक महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषदेच्या वतीने सहा ते ११ जानेवारी या कालावधीत विशेष स्वच्छता मोहिमेचे आयोजन करण्यात आले असून शनिवारी ग्रामस्तरावर विविध उपक्रम राबविण्यात आले. शाळांमध्ये स्वच्छता शपथ, पंचायत समिती तसेच ग्रामपंचायत कार्यालयांची स्वच्छता करण्यात आली. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष स्वच्छता मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. या मोहिमेत जिल्हा परिषदेच्या सात प्रमुख विभागांचा सहभाग असून दररोज विविध उपक्रम राबविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. पहिल्या दिवशी जिल्ह्यात ग्रामपंचायत कार्यालय तसेच पंचायत समिती कार्यालयांची स्वच्छता करण्यात आली. शाळांमध्ये स्वच्छता शपथ घेण्यात आली. आरोग्य विभागांतर्गत किशोरवयीन मुलींचे मेळावे घेऊन त्यांना वैयक्तिक स्वच्छता तसेच अन्य आरोग्यविषयक माहिती देण्यात आली. अंगणवाडी केंद्रांचीही स्वच्छता करण्यात आली.

कर्तव्यावरील पोलीस निरीक्षकाला फोन, केवायसी अपडेटबाबत विचारणा अन् लाखोंचा गंडा

■मुंबई। प्रतिनिधी,

केवायसी अपडेट तसेच बँकांसंदर्भात कोणतेही व्यवहार करताना सावधगिरी बाळगा, असे आवाहन, जनजागृती पोलिसांमार्फत वारंवार केली जाते. मात्र पोलिसच अशा सायबर जाळ्यात अडकत असतील तर... खेरवाडी पोलिस ठाण्यात कार्यरत असलेल्या एका निरीक्षकाला तब्बल पाच लाख रुपयांना गंडवण्यात आले आहे. या प्रकाराची तक्रार संबंधित निरीक्षकाला आपल्याच पोलिस ठाण्यात करावी लागली आहे.

खेरवाडी पोलिस ठाण्यात बुधवारी हे निरीक्षक कामावर हजर झाले. पोलिस ठाण्यात असतानाच त्यांना एका व्यक्तीचा फोन आला. त्याने निरीक्षकाला त्याच्या बँक खात्याचा तपशील देत तुमच्या खात्याची केवायसी अपडेट नसल्याचे सांगितले. केवायसी अपडेट नसल्याने तुमचे खाते स्थगित करण्यात आले असून, लवकरात लवकर केवायसी अपडेट न केल्यास खाते बंद केले जाईल, असे सांगण्यात आले. याच बँक खात्यामधून गृहकर्जाचा हप्ता जात असल्याने पोलिस निरीक्षकाने केवायसी अपडेट करण्याचा निर्णय घेतला.

केवायसी ऑनलाइन अपडेट करण्यासाठी भामट्याने त्यांना एक ॲप डाउनलोड करण्यास सांगितले. या ॲपवर जाऊन वैयक्तिक माहिती आणि बँक खात्याचा तपशील भरण्यास सांगण्यात आले. ही माहिती भरल्यानंतर कस्टमर केअरवर संपर्क करण्यास सांगून एक मोबाइल क्रमांक दिला. निरीक्षकाने या क्रमांकावर संपर्क साधला असता तो बंद येत होता. काही वेळाने याच क्रमांकवरून व्हिडीओ कॉल आला. त्याने ॲपवर भरलेली माहिती देण्यास सांगून केवायसी अपडेटसाठी मोबाइलवर आलेले ओटीपी मागितले. निरीक्षकाने तीन ओटीपी दिले आणि त्यानंतरही ही प्रक्रिया सुरूच ठेवल्याने त्यांना संशय आला आणि त्याने फोन बंद केला. त्यानंतर बँकेतील जमा रक्कम तपासत असताना पाच लाख रुपये काढण्यात आल्याचे लक्षात आले. निरीक्षक कार्यरत असलेल्या खेरवाडी पोलिस ठाण्यातच त्याच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

"मित्र पक्षांना विचारात घेतले नाही, तर परिणाम भोगावे लागतील..."

■अमरावती। प्रतिनिधी,

आमचे पक्ष जरी लहान असले तरी आमचे स्वतंत्र अस्तित्व आहे. येत्या निवडणुकीमध्ये कोणत्या पक्षाला किती जागा देणार हे भाजपने स्पष्ट केले पाहिजे. सगळेच घटक पक्ष नाराज आहेत. महायुतीचा धर्म पाळला गेला पाहिजे आणि दोन्हीबाजूंनी तो पाळला गेला पाहिजे. मित्र पक्षांना विचारात घेतले नाही, तर त्याचे परिणाम भाजपला भोगावे लागतील, असा इशारा प्रहार जनशक्ती पक्षाचे आमदार बच्चू कडू यांनी दिला आहे. भाजपने आमचा ह्यकामापुरता मामाह्न करू नये, असा टोला देखील त्यांनी लगावला आहे.

प्रसार माध्यमांशी बोलताना बच्चू कडू यांनी पुन्हा एकदा आपली नाराजी व्यक्त केली. महायुतीच्या बैठकीचा निरोप वेळेवर सकाळी आला. त्यामुळे मुंबईतील बैठकीला उपस्थित राहता आले नाही. बैठकीचे काय विषय हे माहीत नसतात, ते थेट बैठकीला बोलावतात, असे बच्चू कडू म्हणाले.

मित्र पक्षांची गरज नाही, म्हणून भाजप असे वागत असेल, तर ते चुकीचे आहे. भाजप हा मोठा पक्ष आहे. महायुतीचे आम्ही छोटे घटक आहोत. पण, आमचाही विचार व्हायला हवा.

आमची विचारपूस होणार नसेल, तर त्याचे परिणाम भोगावे लागतील, असा इशारा बच्चू कडू यांनी दिला. आपण विधानसभेच्या १५ जागांची मागणी केली असून काही लोकसभा मतदार संघात निवडणूक लढण्याची प्रहार जनशक्ती पक्षाची तयारी आहे. पण, अजूनपर्यंत भाजपने आमच्यासोबत चर्चा केलेली नाही. चर्चा होणार नसेल, तर ते अडचणीचे ठरेल, असे बच्चू कडू म्हणाले.

लहान मुलांच्या पित्तनलिकेतील अडथळे दूर करणे होणार सोपे

■मुंबई। प्रतिनिधी,

पित्तनलिकेत खडे झाल्यास, पित्तनलिका अरुंद झाल्यास किंवा बंद झाल्यास पित्ताचा त्रास होऊन काविळसारखा आजार होतो. अशा रुग्णांच्या पित्तनलिकेमध्ये एंडोस्कोपिक रेट्रोग्रेड चोलांगिओपॅन्क्रएटोग्राफीचा (ईआरसीपी) वापर करण्यात येतो. मोठ्या व्यक्तींप्रमाणे लहान मुलांमध्येही याच नळीचा वापर करण्यात येत असला तरी लहान मुलांसाठी ती वापरणे अनेकदा त्रासदायक ठरते. ही बाब लक्षात घेता आता नायर रुग्णालयात पिडिएट्रिक स्लिम ड्युओडेनोस्कोप उपलब्ध करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. त्यामुळे आता दीड वर्षांपासून पुढील लहान मुलांच्या पित्तनलिकेतील अडथळे दूर करणे शक्य होणार आहे. शरीरात तयार होणारे पित्त हे पित्तनलिकेद्वारे शरीरात वाहत असते. मात्र अनेक कारणांमुळे पित्तनलिकेत खडे तयार होतात किंवा पित्तनलिका अरूंद होते. अशावेळी पित्तनलिकेतून वाहणारे पित्त हे नलिकेबाहेरून वाहण्यास सुरुवात होते. त्यामुळे ते हळूहळू संपूर्ण शरीरात पसरण्यास सुरुवात होते. परिणामी काविळसारखा आजार होतो. अशा प्रकरणांमध्ये शस्त्रक्रिया करण्याबरोबरच एंडोस्कोपिक रेट्रोग्रेड चोलांगिओपॅन्क्रिएटोग्राफीच ा (ईआरसीपी) वापर करण्यात येतो किंवा शस्त्रक्रिया करण्यात येते.

आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या शेतकऱ्यावर गुन्हा दाखल, तहसीलदारांनी न्याय देण्याऐवजी...

■यवतमाळ। प्रतिनिधी,

शेतातील नाला वळविण्यात आल्याने पिकांचे नुकसान झाले. वारंवार मागणी करून न्याय मिळत नसल्याने शेतकऱ्याने आर्णी तहसीलदार परशराम भोसले यांच्या कक्षात विषारी औषध प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी तहसीलदारांनी शेतकऱ्याला न्याय देण्याऐवजी त्याच्या विरोधात शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हे दाखल केले. आर्णी तहसील प्रशासनाच्या या कारभाराविरोधात सर्व स्तरातून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

गौतम गेडे (रा. जवळा, ता. आर्णी) असे विष प्राशन करणाऱ्या शेतकऱ्याचे नाव आहे. त्यांनी नववर्षच्या पहिल्याच १ जानेवारी रोजी आर्णी तहसीलदार परशराम भोसले यांच्या कक्षात विष प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी तहसीलदार भोसले यांनी आर्णी पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यावरून शासकीय कामात अडथळा निर्माण करण्यात आल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला. यावर आमदार डॉ. संदीप धुर्वे यांनी संताप व्यक्त केला.अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांशी सन्मानाने वागावे, असा इशारा त्यांनी दिला आहे. अधिकाऱ्यांनी शेतकऱ्याची बाजू घेतली असती तर, ही वेळ आली नसती.

मुंबई पारबंदर प्रकल्प नवीन मुंबई अन् रायगडचा विकास साधेल, मुख्यमंत्री शिंदे यांचं विधान

■मुंबई। प्रतिनिधी,

मुंबई पारबंदर प्रकल्पामुळे (शिवडी-नाव्हाशेवा सागरी सेतू) मुंबई ते नवी मुंबई असा दीड ते दोन तासाचा प्रवास केवळ २० मिनिटांत पार करता येणार आहे. त्यामुळे वाहनचालक, प्रवाशांना दिलासा मिळणार आहेच, पण त्याचवेळी नवी मुंबई, रायगडचा सर्वांगीण विकास होईल, असे मत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शनिवारी व्यक्त केले.

शिवडी-नाव्हाशेवा सागरी सेतूचे १२ जानेवारीला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लोकार्पण होणार आहे. या पार्श्वभूमीवर शनिवारी मुख्यमंत्र्यांनी या प्रकल्पाला भेट देऊन प्रकल्पाच्या कामाचा आणि लोकार्पणाच्या कामाचा आढावा घेतला. यावेळी मुंबई उपनगरचे पालकमंत्री मंगल प्रभात लोढा, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, मुंबई मनपाचे आयुक्त तथा प्रशासक आय.एस. चहल, मुंबई महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी आदी उपस्थित होते. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) देशातील सर्वात लांब अशा २१.८० किमी लांबीच्या शिवडी-नाव्हाशेवा सागरी सेतूचे काम अखेर आता पूर्ण झाले आहे. त्यामुळे राज्य सरकारने या प्रकल्पाचे लोकार्पण करण्याचा निर्णय घेतला आहे.

१२ जानेवारीला नवी मुंबईत लोकार्पणाचा भव्य सोहळा संपन्न होणार आहे. तेव्हा शनिवारी सकाळी मुख्यमंत्री या सागरी सेतूवर पोहचले आणि त्यांनी प्रकल्पाचा आढावा घेतला. या प्रकल्पामुळे प्रवास अतिवेगवान होणार असून नवी मुंबई, रायगडचा आर्थिक, औद्योगिक विकास साधला जाणार आहे. तर मुंबईतील वाहतूक कोंडी सुटण्यास मदत होणार असल्याचे यावेळी मुख्यमंत्री म्हणाले. या प्रकल्पाचे काम पर्यावरणाचा समतोल राखून पूर्ण केले असून समतोलामुळे शिवडी समुद्र परिसरात फ्लेमिंगो पक्षी वाढले असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. सागरी सेतूची पाहणी करताना मुख्यमंत्र्यांनी एमएमआरडीएला अनेक सूचना केल्या.

जळगाव जिल्ह्यात रोहित्रातील तांब्याची तार, प्लेटांचीही चोरी; दोघा संशयितांकडून मुद्देमाल जप्त

■जळगाव। प्रतिनिधी,

जिल्ह्यातील चाळीसगाव शहरानजीकच्या एमआयडीसी परिसरातील रोहित्रातून सुमारे चार लाखांची तांब्याची तार आणि प्लेटा चोरी प्रकरणातील संशयितांच्या शहर पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरणाच्या पथकाने मुसक्या आवळल्या. दोन संशयितांकडून सुमारे एक लाखाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, चाळीसगाव शहरानजीकच्या एमआयडीसी परिसरातील मॉर्निसा बायो ऑर्गनिक प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीतील रोहित्रातील सुमारे चार लाख १० हजार रुपयांची तांब्याची तार आणि प्लेटांची चोरी झाली होती. त्यासंदर्भात सचिन नागरे (रा. हिरापूर रोड, चाळीसगाव) यांच्या तक्रारीवरुन शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्यातील अहमद शेख इस्माईल (२७) आणि सलमान बेग हुसेन बेग (२६, दोन्ही रा. जहांगीरवाडी, चाळीसगाव) यांची माहिती तपासाधिकारी दीपक पाटील यांना मिळाली. त्यानुसार त्यांनी पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांना माहिती दिली. त्याअनुषंगाने सहायक फौजदार शशिकांत महाजन, हवालदार योगेश बेलदार, नितीन वाल्हे, भरत गोराळकर, अमोल पाटील, नंदकिशोर महाजन, अजय पाटील, अमोल भोसले यांच्या नव्यानेच रचना करण्यात आलेल्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने तपासचक्रे फिरवत दोघा संशयितांच्या मुसक्या आवळल्या. संशयितांना न्यायालयासमोर उभे केले असता, पोलीस कोठडी सुनावण्यात आली. तपासादरम्यान संशयितांकडून चोरीस गेलेल्या मालापैकी एक लाख चार हजार ६९० रुपयांची १४५ फूट तार जप्त करण्यात आली. उर्वरित मुद्देमाल संशयितांकडून हस्तगत करण्यासाठी चौकशी सुरू असल्याचे पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांनी सांगितले.

चोरीस गेलेला मुद्देमाल तक्रारदारांना परत, नाशिक शहर पोलिसांचा उपक्रम

■नाशिक। प्रतिनिधी,

शहर परिसरातील सोनसाखळी, भ्रमणध्वनी, वाहन चोरी, जबरी चोरी यांसह अन्य गुन्ह्यांमध्ये गुन्हे शाखा एक आणि दोनने परत मिळविलेला तीन कोटीहून अधिक रकमेचा मुद्देमाल तक्रारदारांना पोलिसांकडून परत करण्यात आला.

पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा एक आणि दोनच्या वतीने काही गुन्हे उघडकीस आले. त्याअंतर्गत आरोपींकडून गुन्ह्यातील मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. वेगवेगळ्या कारवाईत ३५,७१,९९७ रुपयांचे दागिने, १५ लाख ९५ हजार रुपयांच्या दुचाकी, ५८ लाख पाच हजार रुपयांच्या चारचाकी, तीन लाख ६७ हजार ५०० रुपयांचे भ्रमणध्वनी तसेच दोन कोटी ५३ लाख ३१ हजार २०० रुपये परत मिळविण्यात आले. शुक्रवारी पोलीस आयुक्तालय परिसरात तक्रारदारांना त्यांचा मुद्देमाल सन्मानपूर्वक परत करण्यात आला. दर्शना आढाव, स्नेहल येलमल्ले, मंगेश काजे, सुनील यादव, नितीन गवांदे, बापू सूर्यवंशी आदी तक्रारदारांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. आतापर्यंत आठ वेळा मुद्देमाल परत करण्यात आला असून हा आकडा नऊ कोटी १४ लाख एक हजार ३९९ रुपयांपर्यंत गेला आहे.

ताप, सर्दी, खोकला असल्यास करोना चाचणी करा, राज्य करोना कृती दलाच्या सूचना

■मुंबई। प्रतिनिधी,

पर्यटनासाठी गेलेले नागरिक घरी परत येत आहेत. त्यांच्यामार्फत पुढील काही दिवस करोना संसर्ग मोठ्या प्रमाणात पसरण्याची शक्यता आहे. त्यामुळे ताप, सर्दी, खोकला इत्यादी लक्षणे असणाऱ्या व्यक्तींची करोना चाचणी करण्यात यावी अशा सूचना राज्य करोना कृती दलाकडून देण्यात आल्या आहेत. मागील काही दिवसांपासून करोना रुग्णांच्या संख्येत वाढ होत आहे.

मात्र रुग्णांमध्ये सौम्य स्वरुपाची लक्षणे आढळून येत आहेत. रुग्णालयात भरती होण्याच्या प्रमाणही कमी असून, मृत्यूच्या संख्येतही वाढ झालेली नाही. मात्र नाताळ तसेच नवीन वर्षानिमित्त सुट्टी घेऊन पर्यटनासाठी गेलेले नागरीक घरी परतले आहेत. त्यांच्यामार्फत करोना परसरण्याची शक्यता आहे. त्यामुळे ताप, सर्दी, खोकला अशी लक्षणे असणाऱ्या व्यक्तींची करोना चाचणी करावी. तसेच बाधित आढळल्यास त्यांच्या सतत संपर्कात येणाऱ्या व्यक्तींचीही करोना चाचणी करण्यात यावी, अशी सूचना राज्य करोना कृतीदलाचे अध्यक्ष डॉ. रमण गंगाखेडकर यांनी सर्व रुग्णालयांसह नागरिकांना दिल्या आहेत.

करोना बाधित व्यक्तींना नजीकच्या रुग्णालयात उपचारसाठी न्यावे, रुग्णालयात भरती करण्याची आवश्यकता नसल्यास ५ दिवस शक्यतो गृहविलगीकरणात ठेवावे. तसेच शक्यतो खिडक्या बंद न करता घरात हवा खेळती राहील याची नागरिकांनी काळजी घ्यावी, अशा सूचनाही त्यांनी केल्या आहेत.

करोना लक्षणे असणाऱ्या रुग्णांनी इतरांना संसर्ग होऊ नये यासाठी मुखपट्टी वापरावी. करोना बाधित व्यक्तींनी इतरांमध्ये मिसळणे टाळावे. अतिजोखमीच्या व्यक्तींनी करोना लक्षणे असणाऱ्या व्यक्तींचा संपर्क शक्यतो टाळावा अथवा संपर्कादरम्यान मुखपट्टीचा वापर करण्याचा सल्लाही राज्य करोना कृती दलाचे अध्यक्ष डॉ. रमण गंगाखेडकर यांनी दिला. रॅपिड अंटिजेन चाचणीनुसार बाधित आढळल्यास लक्षणानुसार उपचार करण्यात यावे. लक्षणे असून रॅपिड अँटिजेन चाचणी नकारात्मक असल्यास अशा रुग्णांची आरटीपीसीआर चाचणी करावी, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.